**नेमणे आहे**
नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.
१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड
संपर्क:- ८८९६७११७११
jantaawajnews@gmail.com

# दैनिक जनता आवाज

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १०८ रविवार, दि. ०८ जून २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये




# ...अन् खोटे आरोप थांबवा

## राहुल गांधींच्या टीकेवर मुख्यमंत्री फडणवीस यांचा पलटवार



जनता आवाज वृत्तसेवा

**मुंबई : राहुल गांधींचे हे वर्तन त्यांच्या पक्षाच्या सततच्या पराभवामुळे आलेल्या नैराश्याचे प्रतीक आहे. त्यांनी खोटे आरोप करण्याऐवजी जनतेसमोर जाऊन विश्वास मिळवण्याचा प्रयत्न करावा. या वादामुळे राजकीय वातावरण तापले असून, भाजपने राहुल गांधींवर जोरदार टीका केली आहे. काँग्रेसने मात्र राहुल गांधींच्या आरोपांचे समर्थन केले आहे. राहुल गांधी यांनी आपल्या लेखात महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजपने निवडणूक प्रक्रियेचा गैरवापर केल्याचा आरोप केला आहे. या आरोपांवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली.**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजपने चोरी केली असल्याचा गंभीर आरोप केला आहे. असून, राहुल गांधींना आत्मपरीक्षण करण्याचा सल्ला दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या निवडणूक प्रक्रियेवरील आरोपांवर तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. या आधी देखील राहुल गांधी यांनी अमेरिकेतील बोस्टन येथे झालेल्या कार्यक्रमात भारताच्या निवडणूक आयोगावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. भारताच्या लोकशाहीची बदनामी करण्याचा राहुल गांधी यांचा प्रयत्न असून ते महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींचा अपमान करत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

राहुल गांधींच्या आरोपांवर भाजपने तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. भाजप प्रवक्त्यांनी म्हटले की, राहुल गांधींनी निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून देशाच्या लोकशाही संस्थांचा अपमान केला आहे. दुसरीकडे, काँग्रेसने राहुल गांधींच्या आरोपांचे पान ४

### आलेल्या पराभवामुळे नैराश्याचे प्रतीक

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधींच्या आरोपांना बिनबुडाचे आणि लोकशाहीची बदनामी करणारे असे संबोधले आहे. त्यांनी म्हटले की, राहुल गांधींनी परदेशात जाऊन भारताच्या निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून देशाची प्रतिमा मलीन केली आहे. फडणवीस यांनी पुढे सांगितले, राहुल गांधींचे हे आरोप त्यांच्या निवडणूक पराभवामुळे आलेल्या नैराश्याचे प्रतीक आहेत. त्यांनी आत्मपरीक्षण करून जनतेचा विश्वास मिळवण्याचा प्रयत्न करावा.

# एकनाथ शिंदे बोलतात कमी, पण काम परफेक्ट

## पर्यटन मंत्री शंभूराज देसाई



जनता आवाज वृत्तसेवा

**अहिल्यानगर :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलतात कमी, पण परफेक्ट काम करून दाखवतात. कार्यकर्त्यांवर बारीक लक्ष देणारा व सर्वसामान्यांची प्रश्न सोडविणारा नेता पक्षाला लाभला आहे. पक्षासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी योगदान द्यावे, पक्षाचे मिळालेले पद लोकांच्या उपयोगी आले पाहिजे, आठवड्यातून दोन दिवस पक्षासाठी देण्याचे आवाहन पर्यटन मंत्री तथा संपर्क नेते शंभूराज देसाई यांनी केले.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या वतीने पदाधिकारी मेळाव्यात मार्गदर्शन करताना पर्यटन मंत्री देसाई बोलत होते. सावेडी येथील माऊली सभागृहात झालेल्या मेळाव्यासाठी जिल्ह्यातून शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, बाबूशेठ टायरवाले, शहर प्रमुख सचिन जाधव, पान ४

## संमिश्र

### सीजीओ कॉम्प्लेक्सला बॉम्बची धमकी

जनता आवाज वृत्तसेवा

**नागपूर :** नागपूर येथील सेमिनरी हिल परिसरात असलेल्या सीजीओ कॉम्प्लेक्समधील पेट्रोलियम आणि स्फोटक सुरक्षा संघटनेच्या कार्यालयाला बॉम्बने उडवण्याची धमकी ईमेलद्वारे मिळाल्याने एकच खळबळ उडाली. दुपारी २.३० वाजेपर्यंत सीजीओ इमारतीला बॉम्बस्फोटाने उडवले जाईल, अशा धमकीचा ईमेल आला होता.

### चक्क ६ मुलांना जिवंत जाळले

जनता आवाज वृत्तसेवा

**बिहार :** ३१ डिसेंबर २००५, वेळ रात्री ११:३० वाजता. बिहारच्या वैशाली जिल्ह्यातील रामपूर श्यामचंद गाव. ५० वर्षीय विजेंद्र मातीच्या घराच्या व्हरांड्यात ब्लँकेट पांघरून झोपला होता. अचानक त्याला काही पावलांचा आवाज ऐकू आला. त्याने ब्लँकेट काढताच त्याला त्याच्या घरासमोर १५-१६ लोक उभे असलेले दिसले. त्यांच्या हातात गॅलन, दोरी, काठ्या, पोते आणि बंदुका होत्या. विजेंद्र घाबरला. त्याने पळून जाण्याचा प्रयत्न करताच ४-५ जणांनी त्याला पकडले.

### ... आता स्टॅम्प पेपर मागणे बेकायदा

जनता आवाज वृत्तसेवा

**मुंबई :** शासकीय कार्यालयांतील ई-सेवा केंद्रात केली जाणारी १०० व ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरची मागणी बेकायदा असल्याचा आदेश राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काढला आहे. अशा कोणत्याही स्टॅम्प पेपरची मागणी करू नका, असे आदेश दिले.




# ...त्वरीत काम सुरू करा : डांगे



जनता आवाज वृत्तसेवा

**अहिल्यानगर :** पावसामुळे महानगरपालिकेच्या केडगाव अमरधाम व आंबेडकर भवनाची भिंत खचून पडली आहे. या दोन्ही भिंती नव्याने बांधण्यात येणार असून, त्याचे काम सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच, केडगाव अमरधाम स्मशानभूमीतील दहन ओट्यावरील जाळ्या तुटल्या आहेत. त्याची दुरुस्ती व नवीन जाळ्या लवकरच बसवण्यात येतील, असे आश्वासन आयुक्त यशवंत डांगे यांनी दिले.

आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी काल सकाळी केडगाव परिसरात पाहणी केली. यावेळी माजी नगरसेवक मनोज कोतकर उपस्थित होते.

आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केडगाव अमरधाम येथे पडलेल्या भिंतीची पाहणी केली. तसेच, स्मशानभूमीतील अंतर्गत सुविधांचीही त्यांनी पाहणी केली. तेथील जाळ्यांची दुरवस्था झाल्याने अंत्यसंस्कार करताना अडचणी येतात, त्यामुळे या जाळ्यांची दुरुस्ती किंवा नवीन जाळ्या बसवणे आवश्यक असल्याचे कोतकर यांनी आयुक्तांच्या निदर्शनास आणले. तसेच, आंबेडकर भवनाच्या भिंतीचीही आयुक्तांनी पाहणी केली. अमरधाम व आंबेडकर भवन या दोन्ही ठिकाणी भिंत बांधण्याचे काम तत्काळ सुरू होईल. त्याबाबत पान ४

# सध्या राजकारणात निष्ठेला महत्त्व नाही : आदिक

## खा. आदिक यांच्या पुण्यस्मरणानिमित्त श्रीरामपूर तालुक्यात विविध उपक्रम

जनता आवाज वृत्तसेवा

**श्रीरामपूर :** सध्याच्या राजकारणामध्ये निष्ठेला महत्त्व राहिले नाही. मात्र खासदार गोविंदराव आदिक जावून दहा वर्षे झालीत. तरीपण त्यांच्यावरील निष्ठेमुळे धुळे येथील एक कार्यकर्ता पुण्यतिथीनिमित्त पाच दिवस पायी चालत श्रीराम पूरला येतो. तर येथील काही लोक वेगळ्या पक्षात प्रवेश करण्यासाठी गेले आहेत. धुळे येथील या कार्यकर्त्याने धुळे येथून पायी चालत येऊन खऱ्या अर्थाने येथील कार्यकर्त्यांच्या डोळ्यात निष्ठेचे अंजन घातले असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी


(छाया-संजय पगारे)

काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय महासचिव अविनाश आदिक यांनी केले.

खा. गोविंदराव आदिक यांच्या दहाव्या पुण्यस्मरण कार्यक्रमानिमित्त शहरातील साखर कामगार रुग्णालयात महाराष्ट्र कृषक समाज संघटना, साखर कामगार हॉस्पिटल ट्रस्ट एसएमबीटी हॉस्पिटल व आदिक परिवाराच्यावतीने मोफत हृदयरोग तपासणी, रक्तदाब तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी व्यासपीठावर पुष्पलता आदिक, रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मीनाताई जगधने, साखर कामगार रुग्णालयाचे विश्वस्त ज्ञानदेव आहेर, डॉ. रवींद्र जगधने, डॉ. दिलीप पडघन माजी लोकनियुक्त नगराध्यक्षा तथा महाराष्ट्र कृषक समाज संघटनेच्या अध्यक्ष अनुराधाताई आदिक उपस्थित होते. अविनाश आदिक म्हणाले की, पान ४

> दरवर्षी अनुराधाताई आदिक या खा. आदिक यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध प्रकारचे समाज उपयोगी कार्यक्रम घेत असतात. त्या म्हणाल्या, आदिक साहेबांची आठवण काढायची झाल्यास असे उपक्रम झाले पाहिजे. त्यातून समाधान मिळते.
>
> **- अविनाश आदिक**

# बस थांब्यांची पुनर्बांधणी करा : कोल्हे

जनता आवाज वृत्तसेवा

**कोपरगाव :** कोपरगाव मतदारसंघात सध्या विविध गावांमध्ये अंतर्गत रस्त्यांचे शासकीय स्तरावर काम सुरू असून, या रस्त्यांच्या कामांच्या दरम्यान अनेक ठिकाणी शासनाच्या निधीतून उभारण्यात आलेल्या बस थांब्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. काही ठिकाणी हे बस थांबे हटवून टाकण्यात आले असून, काही ठिकाणी ते अर्धवट अवस्थेत उध्वस्त झालेले आहेत.

या पार्श्वभूमीवर जिल्हा बँकेचे संचालक युवानेते विवेक कोल्हे यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे एक महत्त्वाची मागणी केली आहे.

रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदार, संबंधित ग्रामपंचायती आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी रस्ता पूर्ण झाल्यानंतर संबंधित गावांमध्ये आधीप्रमाणेच बस थांबे पुन्हा उभारणे व ज्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे ते करून घेणे बंधनकारक असावे, असे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाने त्वरित काढावेत, अशी आग्रही मागणी त्यांनी केली आहे.

कोपरगाव मतदारसंघातील अनेक गावांमध्ये हे चित्र दिसून येत असून, नागरिकांकडूनही याबद्दल प्रश्न उपस्थित केला जात आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने तत्काळ या समस्येची गंभीर दखल घ्यावी व संबंधित यंत्रणांना योग्य त्या सूचना द्याव्यात, अशी ठाम भूमिका कोल्हे यांनी मांडली.

शासनाच्या निधीतून उभारण्यात आलेले बस थांबे म्हणजे जनतेची संपत्ती असून, त्यांचे जतन करणे संबंधित यंत्रणेचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादनही कोल्हे यांनी केले.



### बस थांबे निवारा देणारे ठिकाण : विवेक कोल्हे

विवेक कोल्हे यांनी स्पष्ट केले की, बस थांबे हे फक्त वाहतूक व्यवस्थेचा भाग नसून नागरिक आणि विशेषतः विद्यार्थी वर्गासाठी निवारा देणारे ठिकाणही आहे. बस येईपर्यंत थांबण्यासाठी सुरक्षित जागा उपलब्ध नसेल तर प्रवाशांना उन्हा-पावसात उभे राहावे लागते, जे आरोग्यास हानीकारक ठरते.

# अहिल्यानगर शहरात बकरी ईद उत्साहात

जनता आवाज वृत्तसेवा

**अहिल्यानगर :** शहरासह जिल्ह्यात मुस्लिम समाज बांधवांनी बकरी ईद काल (दि.७ जून) मोठ्या उत्साहात साजरी केली. शहरातील ईदगाह मैदान येथे सकाळी ९:३० वाजता ईदची नमाज मौलाना नदिम अख्तर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी शहरातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. नमाजच्या प्रारंभी धार्मिक व्याख्यान, नमाजनंतर खुदबा व त्यानंतर मुस्लिम बांधवांनी नमाज अदा केली. देशात शांतता, समृध्दी व सामाजिक सलोख्यासाठी प्रार्थना करण्यात आली. सकाळी ७ वाजल्यापासून शहरातील विविध मशिदीमधून बकरी ईदची नमाज अदा करण्यात आली. ईदनिमित्त नमाज पठण कोठला येथील ईदगाह मैदानात झाले.

# सीना नदी सुशोभीकरण काम पूर्णत्वाकडे

## आ. संग्राम जगताप; सुशोभीकरण कामाची पाहणी

जनता आवाज वृत्तसेवा

**अहिल्यानगर :** शहराच्या सर्वांगीण विकासासाठी उचललेले पाऊल कामाच्या माध्यमातून पूर्णत्वाकडे जात आहे सीना नदी सुशोभीकरणासाठी राज्य सरकारच्या माध्यमातून मोठा निधी प्राप्त करून दिला आहे. त्यानुसार पुणे महामार्ग लगत असलेल्या सीना नदी पात्र सुशोभीकरणाचे पहिल्या टप्प्यातील काम पूर्णत्वाकडे जात आहे. तसेच दुसऱ्या टप्प्यातील अमरधाम कल्याण रोड परिसरातील व तिसऱ्या टप्प्यातील सावेडी गावालगतच्या सीना नदी सुशोभीकरणाचे काम करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.

आ. जगताप यांच्या प्रयत्नातून सुरू असलेल्या सीना नदी सुशोभीकरण कामाची पाहणी करण्यात आली.

यावेळी आ. संग्राम जगताप, माजी उपमहापौर गणेश भोसले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, बोरुडे, शहर उपअभियंता माजी नगरसेवक डॉ. सागर श्रीकांत निंबाळकर, पान ४



### आ. जगतापांना सर्व कामाचे श्रेय :गणेश भोसले

सीना नदी पात्रात सोडण्यात आलेले मैलामिश्रित पाणी आता सीना नदीलगत टाकण्यात आलेल्या मोठ्या पाईपद्वारे वाहून जाऊन त्याचे जलशुद्धीकरण होणार आहे. त्यामुळे आपली सीना नदी आता प्रदूषण मुक्त होईल. या सर्व कामाचे श्रेय आमदार संग्राम जगताप यांना जाते, असे मत माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी व्यक्त केले.

### प्रत्येकाने एक तरी झाडाचे जतन करावे : बारस्कर

सीना नदी पात्राचे रूप पालटणार आहे शहरामध्ये वृक्षरोपण व संवर्धनाची लोक चळवळ उभी करायची आहे तरी नगरकरांनी यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होऊन प्रत्येकाने एक तरी झाडाचे जतन करावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी केले.

# निवडणुक प्रक्रियेवरील विधान म्हणजे मतदारांचा अपमान

## राहुल गांधींच्या विधानाचा जलसंपदा मंत्री विखे पाटील यांनी घेताना समाचार



जनता आवाज वृत्तसेवा

**लोणी : कॉंग्रेस नेते राहूल गांधी यांचा सर्वाधिक वेळ परदेशात जात असल्याने, देशातील राजकीय परीस्थीती समजून घ्यायला त्यांना वेळ लागेल, असा टोला जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी लगावला. निवडणुक प्रक्रीये विरोधातील त्यांची विधान म्हणजे मतदारांचा अपमान असल्याची प्रतिक्रीया माध्यमांशी बोलतांना त्यांनी व्यक्त केली.**

गांधी यांच्या विधानाचा समाचार घेताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, केवळ निवडणूक प्रक्रीयेला बदनाम करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. मागील दोन लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्ष जेमतेम चाळीस जागांपर्यत मजल मारू शकला होता. यंदा चाळीसच्या शंभर झाल्या. मग ते फिक्सिंग होत का? आंध्र आणि हिमाचल राज्यात तुमच्या पक्षाचे सरकार आले. ते सुध्दा फिक्सिंगमुळे आले का? या प्रश्नांची उत्तर सुध्दा राहुल गांधींनी दिली पाहिजे.

निवडणूक प्रक्रीयेबाबत गांधी स्वत:ची बदनामी करून घेत आहेत. लोकसभेची निवडणूक खोटे नॅरेटिव्ह पसरवून केली गेली. काही ठिकाणी त्याचा परीणाम पाहायला मिळाला. विधानसभा निवडणुकीची राजकीय परिस्थिती मात्र वेगळी होती. महायुतीला राज्यातील मतदारांनी कौल दिला. मात्र मतदारांचा सातत्याने अपमान करण्याचे काम गांधी यांच्याकडून होत आहे. त्यांनी देशात वेळ दिला तर, राजकीय परिस्थितीची माहिती होईल.

उध्दव ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत आणि खा. सुप्रिया सुळे यांनी राहुल गांधींच्या वक्तव्याच्या केलेल्या समर्थनाची खिल्ली उडवून, विखे पाटील म्हणाले की, त्यांच्या वक्तव्याकडे दुर्लक्ष करणे योग्य ठरेल. खा. सुप्रिया सुळे यांना स्वत:चे कोणतेच मत राहिलेले नाही. लोकसभेत मांडण्यात आलेल्या विधेयकाला ते कधी पाठींबा देतात, कधी चर्चेच्या वेळी गैरहजर राहतात. त्यांचे पिताश्री मोदींचे कौतुक करतात. याकडे लक्ष वेधून त्यांनी खरच एकदा निर्णय घेतला पाहीजे की, आघाडीसोबत राहायचे की मोदींच्या बरोबर काम करायचे. त्यांच्या पक्षातील लोकांचा सुध्दा त्यांच्यावर विश्वास राहिलेला नाही.

> उध्दव आणि राज ठाकरे यांच्या एकत्रित येण्याच्या मुद्द्यावर भाष्य करताना मंत्री विखे म्हणाले की, महाराष्ट्रातील जनतेच्या मनात फक्त महायुती आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही तेच चित्र पाहायला मिळेल,निवडणुका महायुती म्हणूनच आम्ही लढणार असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.



# संगमनेरात 'दंडकारण्य'अंतर्गत २५२५ वटवृक्षांचे रोपण करणार

## प्रकल्पप्रमुख दुर्गाताई तांबे व डॉ. जयश्री थोरात यांची माहिती; गावागावात होणार वटवृक्षांचे रोपन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** थोर स्वातंत्र्य सेनानी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून हरितसृष्टीसह पर्यावरण संवर्धनाचा मुलमंत्र देणाऱ्या दंडकारण्य अभियानाअंतर्गत वटवृक्ष लागवड सप्ताहात मंगळवार दिनांक १० जून २०२५ रोजी वटसावित्री पौर्णिमेनिमित्त तालुक्यातील प्रत्येक गावात व वाडीवस्तीवर २५२५ वटवृक्षांचे रोपन करण्यात येणार असल्याची माहिती प्रकल्पप्रमुख दुर्गाताई तांबे व डॉ. जयश्री थोरात यांनी दिली.





दुर्गाताई तांबे म्हणाल्या की, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून सुरू झालेले हे अभियान माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, दंडकारण्य अभियानाचे मुख्यप्रवर्तक मा. आ. डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली लोकचळवळ झाले आहे. वृक्षसंस्कृती जोपासणाऱ्या या चळवळीने देशपातळीवर मोठा लौकिक निर्माण केला आहे. प्रत्येक नागरिकाचा सहभागामुळे या चळवळीला यश आले आहे. यामुळे वृक्षतोड टळली असून उजाड बोडखी डोंगरे झाडांनी हिरवीगार दिसू लागली आहे.

भारतीय संस्कृतीत अत्यंत महत्वाचा असणारा वटपोर्णिमा हा महिलांचा सण आहे. वडाचे झाड अत्यंत औषधी व आरोग्यासाठी फलदायी आहे. आयुर्वेदामध्येही वटवृक्ष, रुई, उंबर, पिंपळ या झाडांना देव वृक्ष म्हणून संबोधले आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे ही वृक्ष जास्त प्रमाणात वटवृक्षाची सावली व थंडावा पशुपक्षांनाही आकर्षित करतो म्हणून असा हा वटवृक्ष प्रत्येक गावात व वाडीवस्तीवर असावा यासाठी दंडकारण्य अभियान समितीच्या वतीने प्रत्येक गावात व वाडीवस्तीसाठी किमान पाच असे तालुक्यात एकूण २५२५ वटवृक्षाचे रोपे देण्यात येणार आहे.

वटपौर्णिमेच्या दिवशी महिला भगिनीच्या हस्ते या झाडाचे रोपन करुन त्याच्या पूजन व संगोपणाची जबाबदारी स्थानिक नागरिकावर देण्यात येणार आहे, असेही त्या म्हणाल्या.

> पर्यावरणाचा ऱ्हास होत चालल्याने ग्लोबल वॉर्मिगची समस्या उभी राहून उन्हाळ्यात लहान, मोठ्या सजिवांना जगणे असहाय झाले आहे. म्हणून प्रत्येक महिलेने किमान एक झाड लावून त्याचे संवर्धन केले पाहिजे. घराच्या भोवती परसबाग लावून फळझाडे, फूलझाडे वाढवावी. पुढील पिढीला चित्रातून झाडे दाखविण्याऐवजी प्रत्यक्ष त्या झाडाच्याच सावलीत खेळण्याचा आनंद मिळावा म्हणून दंडकारण्य अभियानात प्रत्येकाने सहभाग नोंदवावा.
>
> **– डॉ. जयश्रीताई थोरात**

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय शहरालगत करा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** आम आदमी पार्टीच्या वतीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अहिल्यानगर शहराच्या लगत करण्याची मागणी करुन शहराबाहेर वैद्यकीय महाविद्यालय करण्यास विरोध दर्शविण्यात आला आहे.

सदर मागणीसाठी आपचे शहराध्यक्ष भरत खाकाळ यांच्या नेतृत्वाखाली आपच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांची भेट घेऊन निवेदन दिले.

याप्रसंगी महिला आघाडी अध्यक्ष ड. विद्याताई शिंदे, महासचिव दिलीप घुले, कला-सांस्कृतिक आघाडी अध्यक्ष प्रकाश वडवणीकर, संघटक रवी सातपुते, सहसंघटक विक्रम क्षीरसागर, सचिव सचिन ऐकाडे, पर्यावरण आघाडी अध्यक्ष अजित कटारिया, उपाध्यक्ष अंबादास जाधव, युवा आघाडी अध्यक्ष विजय लोंढे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

अहिल्यानगर जिल्ह्यासाठी मंजूर झालेला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या सोयीसाठी आणि जिल्ह्याच्या सर्वांगीन विकासासाठी नगर शहरालगत सुरू झाले पाहिजे. शिर्डी येथे सदर महाविद्यालय स्थलांतर करण्याचे षडयंत्र सुरू असून, जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी म्हणून अहिल्यानगर शहर परिसरात हे महाविद्यालय उपयुक्त ठरणार आहे.

यासाठी शहरालगत २५ ते ३० एकर जागाही उपलब्ध आहे. मुख्यमंत्री व संबंधित समितीला आपच्या माध्यमातून पत्रव्यवहार करण्यात आलेला असून, जनतेच्या सोयीचा व हिताचा विचार करून भूमिका घेण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

> शहरातील अनेक महत्त्वाचे प्रकल्प इतर ठिकाणी पळवून नेण्याचा सपाटा राजकीय पुढाऱ्यांनी लावला आहे. यामुळे शहरालगत आजही विमानतळ होवू शकले नाही. मोठे राजकीय नेते शहराला डावलून आपल्या मतदार संघात प्रकल्प घेवून जात आहे. यामुळे शहराचा विकास खुटला जात आहे. शहरासह जिल्ह्याच्या आरोग्यासाठी आणि मध्यवर्ती ठिकाण म्हणून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अहिल्यानगर शहरालगत होण्याची आपची भूमिका आहे. वेळप्रसंगी तीव्र आंदोलन छेडण्याची देखील तयारी आहे.
>
> **– भरत खाकाळ, शहराध्यक्ष, आप**

# वांजरगाव प्राथमिक आरोग्य केंद्र उद्घाटनाच्या प्रतीक्षेत?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** वैजापूर तालुक्यातील वांजरगाव येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र उद्धाटनाच्या प्रतीक्षेत असल्याचे दिसून येत आहे. साधारण दोन ते तीन वर्षांपूर्वी सदरच्या वास्तूचे बांधकाम होऊन दिसत आहे. परंतु यापुढे कुठलीही प्रक्रिया नसल्याने इमारतीच्या कंपाउंड भिंतीला निकृष्ट कामामुळे तडे गेल्याचे दिसून येत आहे.

परिसरात जागृत देवस्थान श्रीक्षेत्र सराला बेट देवस्थान असून या ठिकाणी लाखो भावीक देव दर्शनासाठी येत असतात. सध्या श्री संभाजीनगर जिल्हा तसेच अहिल्यानगर जिल्हा या ठिकाणावरून अनेक भाविक दैनंदिन कामकाज सेवेसाठी येत असतात अनेकांना वैद्यकीय उपचारा अभावी हाल अपेष्टा सहन करावे लागत आहे.

यासंदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच वैजापूर तालुक्याचे आमदार यांच्याशी लवकरच भेट घेणार असल्याची माहिती शिष्टमंडळ यांनी दिली आहे.




### तडे गेलेल्या भिंतीची दुरुस्ती करा

संबंधित विभागाने लवकरात लवकर सदर प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे उद्धाटन करून नागरिकांच्या आरोग्यासाठी लवकरात लवकर सुरुवात करावी. तसेच तडे गेलेल्या भिंतीची दुरुस्ती करावी, अशी मागणी स्थानिक नागरिक तसेच सद्गुरु श्री योगीराज गंगागिरीजी महाराज भक्त मंडळ पंचक्रोशीतील भाविक भक्त यांनी केली आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आदर्श राज्यकर्त्या : शेळके

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिरसगाव :** राजमाता, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी राजकीय संस्कृतीचा आदर्श निर्माण केला. महिला सबलीकरणाची नीती कृतीतून दाखविली. समाजासाठी सर्वकाही उपक्रम राबविणाऱ्या त्या आदर्श राज्यकर्त्या होत्या, असे मत माजी प्राचार्य टी. ई. शेळके यांनी व्यक्त केले.

येथील यशवंत नागरी पतसंस्थेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची३०० जयंती साजरी करण्यात आली. त्याप्रसंगी प्राचार्य शेळके बोलत होते. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन, दीपप्रज्वलन झाले.




याप्रसंगी माजी तहसिलदार गुलाबराव पादीर, प्रा. शिवाजीराव बारगळ, माजी प्राचार्य डॉ. शंकरराव गागरे, लक्ष्मणराव निकम, सोमनाथ सूळ, सचिन काळे, किरण सरोदे, बाळासाहेब गोराणे, मारूती बिंगले, रामचंद्र सुगूर, राम झडे, प्रकाशराव करडे, गजानन पुंड आदी उपस्थित होते.

प्राचार्य शेळके यांनी यशवंत नागरी पतसंस्थचे कार्य आणि प्रगतीबद्दल कौतुक करून पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या राजकीय जीवनाचा आदर्श जपला तर लोकशाही सर्वांना प्रिय होईल, असे मत व्यक्त केले.

चेअरमन साहेबराव रकटे आणि व्हा. चेअरमन मधुकर सातव आदिंनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

# 'अमृतवाहिनी'मध्ये शिवराज्याभिषेक दिनानिमित्त पालकांचा सत्कार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यक्रमाचे केले ऑनलाइन उद्धाटन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** तालुक्यातील अमृतवाहिनी आयटीआयमध्ये शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा झाला. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सदर कार्यक्रमाचे ऑनलाइन उद्धाटन केले. या कार्यक्रमानिमित अमृतवाहिनी आयटीआयमध्ये तंत्र प्रदर्शन भरवण्यात आले.

सदर तंत्र प्रदर्शनाचे उद्धाटन अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे यांनी रिमोटद्वारे केले. या उद्धाटनासाठी संस्थेचे मॅनेजर व्ही. बी. धुमाळ, संस्थेचे अकॅडेमीक डायरेक्टर डॉ. जे. बी. गुरव, अमृतवाहिनी आयटीआयचे प्राचार्य व्ही. व्ही. भाटे, अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेजमधील सिव्हील विभागातील प्रा. चेतन कडलग, अमृतवाहिनी आय. टी. आयचे सर्व स्टाफ, विद्यार्थी व पालक हजर होते. या कार्यक्रमानिमित आयटीआयमध्ये पालकांचा सत्कार करण्यात आला.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च गुणवत्तेचे शिक्षण मिळावे, यासाठी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी अमृतवाहिनी आयटीआयची स्थापना १९८४ साली केली. संस्थेने गुणवत्तेत सातत्य राखल्याने संस्थेचा नावलौकिक वाढला आहे. येथील शैक्षणिक वातावरण, निसर्ग सुंदर परिसर, शिस्त, स्वच्छता तसेच विद्यार्थ्यांना प्लेसमेंट व आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम यशस्वी करण्यात आला आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन मोरे यांनी केले. तर आभार प्राचार्य व्ही.व्ही.भाटे यांनी मानले. तंत्र प्रदर्शनामध्ये भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांचा ही सत्कार करण्यात आला.



### दिग्गज मान्यवरांकडून विद्यार्थ्यांवर शुभेच्छा

यशस्वी विद्यार्थी व पालकांचे संस्थेचे अध्यक्ष माजी शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात, विश्वस्त डॉ. सुधीर तांबे, विश्वस्त शरयू देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, मॅनेजर व्ही. बी. धुमाळ, डायरेक्टर अकॅडेमिक डॉ. जे. बी. गुरव, आयटीआयचे प्राचार्य व्ही. व्ही. भाटे यांनी अभिनंदन केले.

# जामखेडसह खर्डा शहरात ईद उत्साहात



**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** जामखेड शहरासह तालुक्यातील खर्डा, अरणगांव, जवळा, नान्नज, धनेगाव आणि पिंपरखेड येथे रमजान ईद मोठ्या उत्साहात आणि शांततेच्या वातावरणात साजरी करण्यात आली. विविध ठिकाणी ईदगाह मैदानावर मुस्लिम बांधवांनी एकत्र येत सामुहिक नमाज अदा केली आणि सर्वांसाठी सुख-शांतीची प्रार्थना केली.

सकाळी नऊ वाजता झालेल्या मुख्य नमाज पठणाला हजारोंच्या संख्येने मुस्लिम समाज बांधव उपस्थित होते. सर्व मुस्लीम बांधवांना मौलाना मुफ्ती अफजल कासमी यांनी नमाजाचे पठन केले.

या पवित्र प्रसंगी त्यांनी विश्वशांती, बंधुता आणि माणुसकीसाठी प्रार्थना केली. समाजात संवाद वाढावा, प्रेम आणि सेवाभाव बळकट व्हावा, यासाठी मौलाना मुक्ती अफजल कासमी यांनी नमाज अदा करून अल्लाहकडे प्रार्थना केली. तसेच खर्डा येथे ईदगाह मैदानावर मुस्लिम बांधवांनी नमाज पठण केले. बकरी ईद शांततेत पार पाडली. ईदगाह मैदान, खर्डा चौक, नुराणी कॉलणी, तपनेश्वर रोड, आरोळे वस्ती, जयहिंद चौक, मस्जिदी व दर्गा या ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार घडु नये, म्हणून पोलीस निरिक्षक महेश पाटील व खर्डा येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय झंजाड यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

### मान्यवरांनी मुस्लिम बांधवांना दिल्या शुभेच्छा

नमाज पठणानंतर ईदगाह मैदानावर ईदच्या शुभेच्छा देण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते प्रा. मधुकर राळेभात, पोलीस निरीक्षक महेश पाटील, सय्यक पोलीस निरिक्षक नंदकुमार सोनवलकर, पोलीस नाईक रविंद्र वाघ, पोलीस कॉ. अविनाश ढेरे, प्रकाश जाधव, योगेश दळवी, प्रकाश मांडगे आदी मान्यवरांनी उपस्थित राहून मुस्लीम बांधवांना शुभेच्छा दिल्या.

> बकरीद ईदच्या कुर्बानीचे सर्वांनी तंतोतंत पालन करावे असे आवाहन केले तसेच सर्वांनी आनंदाने उत्साहात कायदयाचे पालन व मुस्लिम बांधवांनी बकरी ईद शांततेत व मोठ्या उत्साहात साजरी केली.
>
> **– महेश पाटील, पोलीस निरिक्षक**

# आश्वी बुद्रुक ग्रामसभेत शाळेचे नाव बदलण्यास विरोध

## शाळेचे नाव ही गावची अस्मिता; ग्रामसभेत विविध विषयांवर झाली चर्चा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आश्वी :** संगमनेर तालुक्यातील आश्वी बुद्रुक येथील रयत शिक्षण संस्थेच्या अश्वी इंग्लिश स्कुल व कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव बदलुन देणगीदार भुमीपुत्र अँड. अशोक बोरा यांच्या मातोश्रीच्या नावे करण्यात येणार असल्याचा ठराव स्थानिक स्कुल कमिटीने मंजुर केला असल्याचे समजते.

रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागिय उपाध्यक्ष अरूण कडु यांच्या उपस्थित सदर ठराव संपन्न झाला असल्याचे ही समजते. ग्रामस्थांनी स्थानिक स्कुल कमिटीच्या ठरावाविरोधात ग्रामसभेमध्ये ठराव मांडत नाव बदल्यासाठी विरोधात ठराव मंजुर केला.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, आश्वी इंग्लिश स्कुल व कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव बदलुन आश्वी इंग्लिश स्कुल व शांताबाई मुळचंद बोरा कनिष्ठ महाविद्यालय असे करण्यात यावे, असे देणगीदाराची इच्छा होती.

२०१८ साली सुध्दा अश्वी इंग्लिश स्कुल व कनिष्ठ महाविद्यालय हे नाव बदलण्याचा प्रयत्न संस्थेतील काही पदाधिकारी तसेच स्थानिक स्कुल कमिटीच्या संगनमताने करण्याचा प्रयत्न झाला होता. तेव्हा ही ग्रामस्थांनी तातडीची ग्रामसभा घेत नाव बदलण्याच्या घटनेचा तीव्र निषेध करत नाव न बदलण्याचा ठराव केला होता.

यावेळी सरपंच नामदेव होडगर, उपसरपंच बबनराव शिंदे, ग्रामविकास अधिकारी चांगदेव दरेकर, डॉ. शहनाज शेख, पौर्णिमा कहार, संदिप सोनार, प्रवरा बँकेचे संचालक अजय ब्राम्हणे, आण्णासाहेब जऱ्हाड, नामदेव होडगर, राहुल जऱ्हाड, संतोष ताजणे, अझर शेख, रमेश धर्माधिकारी यासह ग्रामस्थ उपस्थित होते



### ग्रामस्थांनी फिरवली ग्रामसभेकडे पाठ

जवळपास ६ हजाराहून अधिक लोकसंख्या असलेल्या आश्वी बुद्रुक येथील ग्रामसभेला १०० हून कमी ग्रामस्थांची उपस्थिती होती हि चिंतेची बाबा आहे. ग्रामसभेकडे ग्रामस्थांनी पाठ फिरवल्याने गावाचा विकास आणि लोकशाही सहभाग यावर परिणाम होतो. ग्रामसभेला अधिक प्रभावी करण्यासाठी जनजागृती, प्रचार आणि ग्रामस्थांना सहभागी होण्यासाठी योग्य कारणे उपलब्ध करणे आवश्यक आहे.

# अनिता माळवे ज्योतिष पुरस्काराने सन्मानित

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नाशिक :** येथील वेदभूषण ज्योतिष प्रतिष्ठान नाशिक यांच्यातर्फे देण्यात येणारा राज्यस्तरीय ज्योतिष पुरस्कार सुवर्णकार समाजाच्या ज्येष्ठ समाजसेविका अनिता महेश माळवे यांना नुकताच प्रदान करण्यात आला.

पंचांगकर्ते मोहन दाते शास्त्री यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. नाशिक येथील पाटीदार भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय अधिवेशन वेदभूषण ज्योतिष प्रतिष्ठान नाशिक हे अधिवेशन भरविण्यात आले होते.

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उदय कुलकर्णी, हर्षद महाजन, भूषण पाटील, प्रकाश संत, प्रथमेश दीक्षित आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे रंगतदार सूत्रसंचालन गीता सागरे यांनी केले. उपस्थित मान्यवरांचा परिचय पद्मश्री पेटकर दिपाली निकम यांनी करून दिला.




# काकांच्या अचानकपणे जाण्याने आमची खूप मोठी हानी

## सचिन जगताप; जगताप यांचा भगवान महावीर ग्रुपच्यावतीने सत्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** वडिलांच्या निधनानंतर आयुर्वेद कॉलेजची जबाबदारी माझ्यावर पडली आहे ती मी व माझे भाऊ आमदार संग्राम जगताप आम्ही दोघे मिळून यशस्वीपणे पार पाडू, ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली या संस्थेला नावलौकिक मिळून देऊ, काकांच्या अचानकपणे जाण्याने आमची खूप मोठी हानी झाली आहे. अचानकपणे पडलेल्या जबाबदाऱ्या काकांच्या प्रेरणा व विचार अंगीकारून पार पाडू असे प्रतिपादन आयुर्वेद संस्थेचे अध्यक्ष सचिन जगताप यांनी केले.



गुणे गंगाधर शास्त्री आयुर्वेदिक कॉलेजच्या अध्यक्षपदी सचिन जगताप यांची निवड झाल्याबद्दल भगवान महावीर ग्रुपच्या वतीने सत्कार संपन्न झाला यावेळी माजी नगरसेवक संजय चोपडा, अध्यक्ष राजेंद्र तातेड, राजेंद्र गांधी, विकास सुराणा, संतोष भळगट, सुनील औवसरकर, भूषण म्हसे, संतोष गांधी, राजेश दायमा, डॉ. सचिन बोरा, अजय गुगळे, अमित पितळे, प्रवीण शिंगवी, राज व्यास, सागर शर्मा आदी उपस्थित होते.

> गुणे आयुर्वेदिक कॉलेजला १०० वर्षाची परंपरा असून या ठिकाणी हजारो विद्यार्थी घडवण्याचे काम झाले आहे स्व. माजी आ. अरुण जगताप यांनी आयुर्वेद कॉलेजला नावलौकिक मिळवून दिला. शिस्तप्रिय काकांमुळे कॉलेजमधील शिक्षक, विद्यार्थी यांनाही त्यांच्या विचारांची सवय झाली होती. अडचणीच्या काळामध्ये पाठीमागे उभे राहणे काकांची सवय होती, सचिन जगताप व आ. संग्राम जगताप हे आयुर्वेद कॉलेजच्या माध्यमातून काकांचे विचार पुढे घेऊन जातील.
>
> **– संजय चोपडा,**
> माजी नगरसेवक

# मोरवाडी धरणाबाबत मंत्रालयात होणार बैठक -आ. खताळ

## वरवंडी ग्रामस्थांच्यावतीने खताळ यांची पेढेतुला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** यापूर्वीच्या लोकप्रतिनिधींनी तालुक्यातील पठार भागातील जनतेला गेली ४० वर्षापासून पाण्यापासून वंचित ठेवले आहे. या भागातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी मोरवाडी येथे धरण व्हावे, अशी या साकुर पठार भागातील जनतेची अनेक वर्षाची मागणी होती. या मागणीचा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी गांभीर्याने दखल घेतली असून पुढील आठवड्यात बुधवारी मुंबई येथील मंत्रालयामध्ये मंत्री विखे यांच्या प्रमुख उपस्थिती मोरवाडी धरणाच्या संदर्भात जलसंपदा विभागाची महत्त्वपूर्ण बैठक बोलावली असल्याची माहिती आ. अमोल खताळ यांनी दिली.

संगमनेर तालुक्यातील वरवंडी येथील दत्त मंदिरात येथील युवक कार्यकर्ते दत्तात्रेय वर्पे राज पाटोळे आणि समस्त ग्रामस्थ वरवंडी यांच्यावतीने आमदार खताळ यांची पेढेतुला करण्यात आली. यावेळी पत्रकारांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली. सध्या मुळा नदीवर आंबीत व पिंपळगाव खांड ही दोन धरणे आहेत. त्यापैकी पिंपळगाव खांड धरणाच्या लाभक्षेत्रामध्ये साकूर पठारभागातील गावांचा समावेश नसल्याने ही गावे अनेक वर्ष पाण्यापासून वंचित राहिली आहेत. तसेच या धरणाच्या लाभ क्षेत्रात या पठार भागाचा समावेश व्हावा, यासाठी अकोले तालुक्यातील अनेक गावांचा विरोध आहे. त्यामुळे पठार भागासाठी मोरवाडी हे स्वतंत्र धरण व्हावे,



**..तर गाठ माझ्याशी-आ. खताळ**

विधानसभा निवडणुकीच्या वेळी अनेकांनी तुमच्यावर दहशत दादागिरी करून तुम्हाला सोशल मीडियाच्या माध्यमातून धमकविण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याकडे दुर्लक्ष करा. परंतु ते आती करत असेल तर मला सांगा मी त्यांचा नक्कीच बंदोबस्त करेल. माजी आमदारांच्या बगलबच्च्यांचा आपण बंदोबस्त केला आहे. जे काही थोडे फार राहिले आहेत. त्यांचा सुद्धा बंदोबस्त केला जाईल परंतु माझ्या कार्यकर्त्यांच्या केसालाही धक्का लावला तर गाठ माझ्याशी आहे, असा इशारा आमदार अमोल खताळ यांनी यावेळी दिला.

अशी या भागातील नागरिकांची इच्छा आहे. त्यानुसार जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी या भागाचा सर्वे करण्याच्या सूचना जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या होत्या त्यानुसार सर्वे झाला आहे. पुढील आठवड्यात बुधवारी या मोरवाडी धरणाच्या संदर्भात मुंबईला मंत्रालयात जलसंपदा विभागा च्या अधिकाऱ्यांच्या समवेत बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख रामभाऊ राहणे, भाजप तालुकाध्यक्ष गुलाब भोसले, भाजपा राज्य कार्यकारिणी सदस्य रऊफ शेख, खांबा गावचे सरपंच रवींद्र दातीर, ज्येष्ठ नेते बाबासाहेब कुटे, माजी सरपंच बाबाजी सागर, ॲड. अमित धुळगंड, भाजप ज्येष्ठ नेते दादाभाऊ गुंजाळ, आर पी आय तालुका अध्यक्ष आशिष शेळके आदी उपस्थित होते.

# प्रदेशाध्यक्षपदी म्हात्रे तर उपाध्यक्षपदी डॉ. आरोटे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी :** महाराष्ट्र राज्य समाज कल्याण न्यास या संस्थेच्या प्रांतिक अध्यक्षपदी शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे नेते तथा माजी आमदार रुपेश म्हात्रे यांची प्रदेशाध्यक्षपदी तर प्रदेश उपाध्यक्षपदी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉक्टर विश्वास आरोटे यांची निवड करण्यात आली.



तसेच याचबरोबर महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी स्वप्निल भोईर, प्रदेश संपर्कप्रमुख योगेश बेनके, प्रदेश प्रवक्ता संजीवन म्हात्रे, प्रदेश कार्याध्यक्ष नारायण मामा पाटील, प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ.किशोर बळीराम पाटील, प्रदेश अध्यक्ष शिक्षक सेना सुधीर जावळे, उत्तर म. सचिव संजय फुलसुंदर, उत्तर म. प्रदेश संपर्कप्रमुख डॉ.मनिलाल रतिलाल शिंपी, प्रदेश कोकण विभाग अध्यक्ष शंकर खारीक, ठाणे जिल्हा अध्यक्ष ज्ञानेश्वर भोईर, ठाणे जिल्हा सचिव आणि ठाणे जिल्हा अध्यक्ष शिक्षक सेना विलास भोईर, पालघर जिल्हा अध्यक्ष प्रकाश देवळीकर, नाशिक जिल्हा अध्यक्ष मूलचंद भगत, बीड जिल्हा अध्यक्ष फारुख भाई शेख, धुळे जिल्हा अध्यक्ष समाधान पाटील, ठाणे जिल्हा अध्यक्षा (महिला आघाडी) नलिनी चौधरी, नाशिक जिल्हा कार्याध्यक्ष अजित गायधनी, महिला आघाडी समाज कल्याण न्यास जिल्हा अध्यक्ष सौ गायत्री महिंद्र पगार, ठाणे जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र बळीराम काबाडी, ठाणे महिला आघाडी जिल्हा कार्याध्यक्ष ॲड शुभांगी ताई निचिते, भिवंडी शहर जिल्हाध्यक्ष स्वाती कांबळे, पालघर जिल्हा अध्यक्ष प्रकाश देवळीकर, ठाणे जिल्हा महिला अध्यक्ष सौ नलिनीताई घरत, पालघर जिल्हा महिला आघाडी अध्यक्ष अंजलीताई चौधरी आदींची राज्यातील जम्बो कार्यकारणी जाहीर करून पदाधिकाऱ्यांना नियुक्तीचे पत्र प्रदान करण्यात आले.

नुकतीच शिर्डी येथे समाज कल्याण या संस्थेची २४ वार्षिक सर्वसाधारण सभा व पदाधिकारी मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी हास्य प्रबोधनकार तथा समाज कल्याण न्यास संस्थेचे प्रवक्ते संजीवन म्हात्रे होते. तर व्यासपीठावर समाज कल्याण न्यास या संस्थेचे संस्थापक तथा थोर धर्मसेवक डॉ. सोन्या पाटील यासह अनेक मान्यवर व्यासपीठावर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बनावट ॲपची सायबरकडून चौकशी सुरू

## शनैश्वर देवस्थान विश्वस्त मंडळ बरखास्तीची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शनिशिंगणापूर येथील देवस्थानच्या नावे तयार करण्यात आलेल्या बनावट ॲपची सायबर पोलिसांकडून चौकशी सुरू करण्यात आली आहे. दरम्यान चौकशी पूर्ण होईपर्यंत विश्वस्त मंडळ बरखास्त करण्याची मागणी शनिसाई प्रतिष्ठाणचे विशाल सुरपुरिया यांनी मुख्यमंत्र्यांकडे शुक्रवारी निवेदनाद्वारे केली आहे.

शनैश्वर देवस्थानच्या नावे बनावट ॲप तयार करून भाविकांची लूट करण्यात आल्याची तक्रार जिल्हा पोलिस अधीक्षकांकडे करण्यात आली आहे. याबाबत देवस्थानसह काँग्रेस आणि शनिसाई प्रतिष्ठाणने निवेदन दिले आहे. या तक्रारींची दखल घेऊन



पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी याबाबत चौकशी करण्याचे आदेश जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयातील साबयर पोलिसांना दिले आहेत. त्यानुसार सायबर पोलिसांनी शैनश्वर देवस्थानच्या नावाने तयार करण्यात आलेल्या बनावट ॲपची चौकशी सुरू केली आहे. ऑनलाइन ॲप तयार करून त्याद्वारे ऑनलाइन पूजा, तेल अर्पण, शनिदर्शन यांसारख्या सुविधा देण्यात येत आहेत. त्याबदल्यात भक्तांकडून दीड ते दोन हजार रुपये शुल्क करण्यात येत आहे. ही रक्कम भक्तांकडून ऑनलाइन स्वीकारली जात आहे. देवस्थानच्या नावे असलेल्या ऑनलाइन ॲपची चौकशी करण्यात येत असून, या ॲपवर नोंदणी करण्यांकडूनही माहिती घेण्यात येत आहे. याबाबत शनिसाई प्रतिष्ठाणच्या वतीने मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले आहे. देवस्थानचे अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संपत्तीची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली असून, चौकशी पूर्ण होईपर्यंत विश्वस्त मंडळ बरखास्त करावे. देवस्थानवर प्रशासकाची नेमणूक करावी, असे निवेदनात म्हटले आहे.

> शनैश्वर देवस्थानच्या नावे बनावट ॲप तयार करण्यात आल्याच्या तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी सुरू करण्यात आली आहे. ॲपबाबत माहिती घेऊन चौकशी करण्यात येत असून, चौकशी पूर्ण झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
> **मोरेश्वर पेन्दाम, पोलिस निरीक्षक, सायबर पोलिस ठाणे, अहिल्यानगर.**

# विठ्ठलराव वाडगे हे खऱ्या अर्थाने सहकार महर्षी - डॉ. सागर आटोळे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** १२ वर्षापूर्वी संस्थापक चेअरमन विठ्ठलराव वाडगे यांनी वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेट को -ऑपरेटिव्ह सोसायटीचे रोपटे लावले गेल्या १२ वर्षात २८५ कोटी रुपयांच्या ठेवी मिळवणे,महिला बचत गटातील महिलांना २२ कोटींचे कर्ज वाटप करणे, शेतकऱ्यांना बियाणांपासून कृषी मालाला अधिक दर मिळण्यासाठी चैतन्य कृषी उत्पन्न बाजार समिती उभारणे ही सर्व कामे करणारे विठ्ठलराव वाडगे हे खऱ्या अर्थाने सहकार महर्षी असल्याचे गौरवोद्गार बारामती येथील ज्ञानसागर गुरुकुल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.सागर आटोळे यांनी श्रीगोंदा येथे बोलताना काढले.

वृध्देश्वर अर्बन मल्टीस्टेट को ऑपरेटिव्ह सोसायटी श्रीगोंदाच्या १२ व्या वर्धापन दिना निमित्त आयोजित महिला मेळावा आणि विद्यार्थी करियर कार्यक्रमात अध्यक्षपदावरून आटोळे बोलत होते. ते पुढे म्हणाले सामाजिक बांधिलकी आणि सामान्य लोकांच्या उन्नतीचा उदात्त हेतू असला की हे घडते, यासाठी चिकाटी, हेतू शुद्ध असावा लागतो या यशामध्ये ग्राहक, सभासद, कर्मचारी यांचाही वाटा असल्याचे वाडगे यांनी कर्मचाऱ्यांचा सन्मान करून दाखवले. आता कर्ज घेतलेल्या महिलांनी उद्योग छोटा का असेना पण त्यात पैसे गुंतवून स्वतःचा आर्थिक उत्कर्ष करावा तसेच वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेट सोसायटीचा देखील लौकिक वाढवावा, असे आवाहन करून भविष्यात आपण देखील वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेट सोसायटीसाठी ठेवी देऊ.वृध्देश्वर अर्बन मल्टीस्टेट सोसायटी चेअरमन सायली वाडगे यांनी बोलताना १२ वर्षाच्या वाटचालीमध्ये बचत गटातील महिलांनी वेळेवर कर्ज परत केल्याने वर्धापन दिना निमित्त प्रति महिला १ लाख रुपये तसेच प्रति महिला ९० हजार रुपये, प्रति महिला ७० हजार रुपये असे २२ लाखाचे कर्ज वाटप केल्याचे सांगितले.




# रिपाईची शहरात तिरंगा सन्मान यात्रा उत्साहात

## भारतीय सेनेच्या शौर्याला सलाम; देशभक्तीच्या गगनभेदी घोषणा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर :** शहरात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (आठवले) वतीने ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर भारतीय सेनेच्या शौर्याच्या सन्मानार्थ तिरंगा सन्मान यात्रा काढण्यात आली. मार्केटयार्ड चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन तिरंगा सन्मान यात्रेचा प्रारंभ करण्यात आला. मार्केटयार्ड परिसरातून रॅलीचे मार्गक्रमण झाले. यावेळी भारत माता की जय..., भारत जिंदाबाद... पाकिस्तान मुर्दाबाद!, वंदे मातरम... च्या घोषणांनी परिसर दणाणला.

केंद्रीय मंत्री रामदास आठवले व जिल्हा संपर्कप्रमुख श्रीकांत भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष सुनील साळवे यांच्या नेतृत्वाखाली या तिरंगा सन्मान यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. हातात तिरंगा झेंडे घेऊन रिपाईचे पदाधिकारी,



कार्यकर्ते, महिला व बौध्द भिक्खू रॅलीत सहभागी झाले होते.

याप्रसंगी रिपाईचे शहर जिल्हाध्यक्ष किरण दाभाडे, जिल्हाध्यक्ष सुनील साळवे, शहर जिल्हाध्यक्ष किरण दाभाडे, पूज्य भनतेजी संजय कांबळे, जिल्हा सरचिटणीस विजयराव भांबळ, गणेश कदम, शिवाजीराव साळवे, राजा जगताप, कविता नेटके, माया जाधव, अमित काळे, बाळासाहेब नेटके, बापू जावळे, अविनाश घोडके, काळू ससाने, शितल घोडके, रोहित कांबळे, निखिल सूर्यवंशी, योगेश घोडके, पप्पू जगताप, उत्कर्ष भालेराव, आदर्श साळवे आदी उपस्थित होते.सुनील साळवे म्हणाले की, ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून आपल्या भारतीय सैन्याने दहशतवाद्यांना कठोरपणे उत्तर दिले आहे, ज्याचा अभिमान प्रत्येक भारतीयाला आहे. भारतीय सैनिकांनी दहशतवादी आणि त्याला पोसणाऱ्या पाकिस्तानला ऑपरेशन सिंदूर च्या माध्यमातून चांगलाच धडा शिकवला.

# बेलापुर ते लाख रस्त्यावरील अतिक्रमणे काढावीत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** केशव गोविंद (बेलापुर खुर्द) ते चांदेगाव, ब्राम्हणगाव भांड, कारजगाव, लाख या गावांना जोडणारा ग्रामीण मार्ग क्रमाक ३१ वर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झालेली आहेत सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार प्रांताधिकारी तहसीलदार यांनी ही अतिक्रमणे काढावीत, अशी मागणी या गावातील नागरिकांनी केली आहे. श्रीरामपूर येथील उपविभागीय अधिकारी यांना पाठवलेल्या निवेदनात चांदेगाव ग्रामपंचायत सरपंच मधुकर भागवत शिंदे व उपसरपंच सुनिता सुरेश कोतकर यांनी म्हटले आहे की, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सदर या रस्त्याची मध्यापासून दुतर्फावर १२ मीटर रुंदी असणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात या रस्त्याची रुंदी सद्यस्थितीत १० फुट पण शिल्लक राहिलेली नाही. त्यामुळे ४ गावातील दळण वळणास मोठा अडथळा निर्माण होत आहे, रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमे झाल्यामुळे गावातील लहान मुले, विद्यार्थी आणि शेतकरी याच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो, प्रशासनाने रस्त्यालगतची सर्व अतिक्रमणे तातडीने काढावी, अशी मागणी करण्यात आली आहे सदर निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी व तहसीलदार यांना पाठवण्यात आल्या.

# वांजरगावचे आरोग्य उपकेंद्र उद्घाटनाच्या प्रतीक्षेत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** वैजापूर तालुक्यातील वांजरगाव येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र उद्घाटनाच्या प्रतीक्षेत असल्याचे दिसून येत आहे साधारण दोन ते तीन वर्षांपूर्वी सदरच्या वास्तूचे बांधकाम होऊन दिसत आहे. परंतु यापुढे कुठलीही प्रक्रिया नसल्याने इमारतीच्या कंपाउंड भिंतीला निकृष्ट कामामुळे तडे गेल्याचे दिसून येत आहे. परिसरात जागृत देवस्थान श्रीक्षेत्र सराला बेट देवस्थान असून या ठिकाणी लाखो भावीक देव दर्शनासाठी येत असतात. सध्या श्री संभाजीनगर जिल्हा तसेच अहिल्यानगर जिल्हा या ठिकाणावरून अनेक भाविक दैनंदिन कामकाज सेवेसाठी येत असतात. अनेकांना वैद्यकीय उपचारा अभावी हाल अपेष्टा सहन करावे लागत आहे. संबंधित विभागाने लवकरात लवकर सदर प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे उद्घाटन करून नागरिकांच्या आरोग्यासाठी लवकरात लवकर सुरुवात करावी तसेच तडे गेलेल्या भिंतीची दुरुस्ती करावी, अशी मागणी स्थानिक नागरिक तसेच सद्गुरु श्री योगीराज गंगागिरीजी महाराज भक्त मंडळ, पंचक्रोशीतील भाविक भक्त यांनी केली आहे. यासंदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे तसेच वैजापूर तालुक्याचे आमदार यांच्याशी लवकरच भेट घेणार असल्याची माहिती शिष्टमंडळ यांनी दिली आहे.

# वादळी वाऱ्याने सोलर उडाले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर :** तालुक्यातील अनेक ठिकाणी दि.७ जून (शनिवार) रोजी अचानक तीन वाजेच्या सुमारास विजांच्या कडकडासह वादळी वाऱ्यासह पावसाला सुरूवात झाली.परसोडा, शिवराई, बेंदवाडी, दहेगाव, पालखेड, या गावांमध्ये तुफान वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. त्यामध्ये अनेक शेतकऱ्यांचे नुकसानही झाले. गोळवाडी येथील संताराम भिका पगार यांच्या शेतामधील गट क्रमांक १५/१ मध्ये रवींद्र सोलर लुबी कंपनीचे होते. ते सोलर वादळी वाऱ्याने व पावसाने खाली पडले व त्याचे नुकसान झाले. त्यामुळे त्या शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. असे वैजापूर तालुक्यात अनेक ठिकाणी नुकसानी झाले आहे.

# आयात- निर्यात प्रशिक्षण कार्यशाळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर :** जागतिकीकरणामुळे जग अगदी जवळ आले आहे. आपल्या देशात ज्या वस्तू तयार होत नाहीत, त्या वस्तू इतर देशांमधून सहज उपलब्ध होत आहेत. तसेच आपल्या देशात निर्माण होणाऱ्या अतिरिक्त वस्तू आपण इतर देशांमध्ये विक्रीस घेऊन जाऊ शकतो.

याच संधीचा विद्यार्थ्यांना फायदा घेता यावा याकरिता संगमनेर येथील डॉ. आर. एस. गुंजाळ वेलफेअर फौंडेशनच्या वृंदावन कृषी महाविद्यालयाने २ ते ७ जून या कालावधीत ६ दिवसांची आयात निर्यात कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना समृद्धी बिजनेस अकॅडमीचे संचालक राहुल खरातमल यांनी आयात- निर्यात संबंधित सर्व पैलूंचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक घेऊन प्रशिक्षण दिले. संस्थेचे सचिव राहुल गुंजाळ यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांकरिता सतत अश्या प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रोहित उंबरकर यांच्या मार्गदर्शनाखाली जेष्ठ प्राध्यापक डॉ. जयसिंग लामटुळे व इतर शिक्षकांनी या कार्यशाळेचे यशस्वीरीत्या आयोजन केले.

# विद्यार्थ्यांना तत्काळ दाखल्यांचे वितरण करा

## तहसीलदार महेश सावंत यांच्या सेतूचालकांना सूचना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव-** कोपरगाव तहसील कार्यालयात अर्ज प्राप्त झाल्यापासून चोवीस तासाच्या आत विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामासाठी लागणाऱ्या दाखल्यांचे वितरण करण्याच्या सूचना तहसीलदार महेश सावंत यांनी तालुक्यातील सेतू चालकांना दिल्या. कोपरगाव तालुक्यातील सर्व सेतु, महा ई-सेवा केंद्रचालकाची बैठकीत ते बोलत होते.



कोपरगांव तालुक्यातील अर्जदारांना दाखल्यासंदर्भात कुठलाही त्रास होता कामा नये, सर्व सेतूकेंद्र चालकांनी प्रमाणपत्रांसाठीची फी दर्शविणार फलक दर्शनी भागात लावावेत, लवकरच तालुक्यातील सर्व सेतूच्या कामकाजाची तपासणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले. सेतूकेंद्रात अर्ज दाखल झाल्यावर त्याच दिवशी तो ऑनलाईन पोर्टलला अपलोड झालाच पाहिजे. बैठकीत तालुक्यातील सर्व सेतू केंद्र चालक उपस्थित होते.

# जामखेडला झाली ५०९७ घरकूले मंजूर; ५० हजाराचे अतिरिक्त अनुदान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत केंद्र सरकारने महाराष्ट्रातील ग्रामीण भागासाठी १० लाख नव्या घरकुलांचे उद्दिष्ट मंजूर केले असून, त्यामध्ये जामखेड तालुक्याला ५ हजार ९७ घरकुलांचे उद्दिष्ट मिळाले असल्याची माहिती पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शुभम जाधव यांनी ही माहिती दिली.

सर्वासाठी घरे प्रदान करणे या उद्देशाने केंद्र सरकारने २५ जून २०१५ पासून प्रधानमंत्री आवास योजना सुरू केली आहे. प्रधानमंत्री आवास योजना २०१६-१७ या आर्थिक वर्षांपासून सुरू करण्यात आली आहे. त्यावेळी यादीत



नाव नसलेल्या लाभार्थीचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यानंतर अशांची नावे प्रपत्र डमध्ये समाविष्ट करण्यात आली. वर्ष २०२१-२२ पर्यंत तालुक्यातील अनेक लाभार्थ्यांना घरकूल मंजूर झाले होते. मात्र, दोन वर्षाच्या कालावधीत नवीन उद्दिष्ट न मिळाल्यामुळे लाभार्थी प्रतीक्षेत होते.

> २०२४-२५ मध्ये सप्टेंबर महिन्यात ८११ घरकुलांना मंजुरी मिळाली, तर १८ फेब्रुवारी २०२५ रोजी आणखी ३,२०६ घरकुलांचे उद्दिष्ट जामखेड तालुक्याला प्राप्त झाले. आता टप्पा-२ अंतर्गत तिसऱ्या टप्प्याचा शुभारंभ होत असून, प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत केंद्र सरकारने महाराष्ट्रासाठी मंजूर केलेल्या १० लाख घरकुलांपैकी जामखेड तालुक्याला ५,०९७घरकुलांचे उद्दिष्ट मिळाल्याचा आम्हाला आनंद आहे. ही संधी तालुक्यातील गरजू व गोरगरिबांसाठी अत्यंत महत्त्वाची असून, त्यांच्या स्वप्नातील घर प्रत्यक्षात उतरवण्याच्या दिशेने मोठे पाऊल आहे. **- शुभम जाधव, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जामखेड.**

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा २ सन २०२४-२५ ते २०२८-२९ अंतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या घरकुलाच्या अनुदानात राज्याच्या हिश्श्यातून ५० हजार रुपयाची अतिरिक्त वाढ करण्यात आली आहे. सोबतच, मोफत विजेसाठी सौर ३ पॅनलसाठी शासनाने अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना सौर ऊर्जेच्या माध्यमातून मोफत वीज मिळणार आहे. तालुक्यातील मंजूर घरकुलावर सौर ऊर्जा पॅनेल बसणार आहे.

एकूण ५ हजार ९७ घरकुलांचे उद्दिष्ट मंजूर झाले आहे. पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात लवकरच पहिल्या हप्त्याची रक्कम ऑनलाइन पद्धतीने जमा केली जाणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. योजनेअंतर्गत यापूर्वी १ लाख २० हजार रुपये, नरेगामधून २८ हजार आणि शौचालय बांधकामासाठी १२ हजार रुपये असे एकूण १ लाख ६० हजार रुपयांचे अनुदान देण्यात येते. आता यामध्ये ५० हजार रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे; त्यामुळे आता यापुढे लाभार्थ्यांना दोन लाख दहा हजार रुपयांचे अनुदान मिळणार आहे.

# संपादकीय

## गुंतवणूक वाढतेय, पण...

देवेंद्र फडणवीस यांच्या २०१४ मधील मुख्यमंत्रिपदाच्या पहिल्या कार्यकाळात राज्यात मुंबई ते नागपूर या सातशे किलोमीटर लांबीच्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ग्रीनफील्ड महामार्गाची मुहूर्तमेढ रोवली गेली. आज हा महामार्ग विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी 'गेमचेंजर' ठरत आहे. हा महामार्ग आगामी काळात सोळा जिल्ह्यांना भारतातील प्रथम क्रमांकाची मालहाताळणी क्षमता असणाऱ्या जवाहरलाल नेहरू बंदराशी जोडेल. अशाच प्रकारे आता पवनार (जिल्हा वर्धा) ते पत्रादेवी (जिल्हा सिंधुदुर्ग) या अंदाजे ८०० किलोमीटर लांबीच्या शक्तिपीठ महामार्ग उभारणीला गती मिळत आहे. याचसोबत जगातील दहाव्या क्रमांकाचे आणि भारतातील पहिल्या क्रमांकाचे बंदर पालघर जिल्ह्यातील वाढवण येथे उभारण्यात येत आहे. तसेच याच ठिकाणी मुंबईतील तिसरे विमानतळ प्रस्तावित आहे. नवी मुंबईतही मुंबईचे दुसरे आंतरराष्ट्रीय विमानतळ लवकरच प्रवासी सेवेत खुले होईल. या विमानतळाला मुंबईतून जोडणी देणारे रस्ते आणि मेट्रो कामांच्या उभारणीला वेग आला आहे. मुंबईत तब्बल ३३६ किलोमीटर मेट्रोचे जाळे उभारण्यात येते असून ठाण्यात वर्तुळाकार मेट्रोच्या कामांसह मुंबईशी जोडणाऱ्या प्रमुख मेट्रो मार्गांची कामे 'मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण' आणि 'महामेट्रो' कंपनीकडून सुरू आहेत. इतकेच नाही तर, सर्व शहरांमधील अंतर्गत आणि आंतर राज्य परिवहन व्यवस्था सुधारण्यासाठी या परिवहन मंडळाच्या ताफ्यात पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक बसचा समावेश केला जात आहे. अशा रितीने राज्यभरात मोठ्या संख्येने पायाभूत सुविधा प्रकल्पांची उभारणी सुरू आहे. आज वेगवेगळ्या भागांमध्ये विखुरलेल्या महानगरपालिका, राज्य परिवहन महामंडळ, मेट्रो आणि रेल्वे या यंत्रणा स्वतंत्रपणे कार्यरत आहेत. अनेक यंत्रणांच्या या बहुविविधतेमुळे अनेकदा जबाबदाऱ्यांमध्ये समन्वय, आव्हाने आणि प्रकल्प अंमलबजावणीत विलंब होतो. हे टाळण्यासाठी वेगवेगळ्या महानगरांमध्ये विविध यंत्रणांमार्फत कार्यरत असलेल्या परिवहन सेवा एकत्रित आणि सुसूत्र करण्यासाठी हे प्राधिकरण उपयुक्त ठरणार आहे. अमेरिकेत १९६० च्या दशकात 'इनविट' ही संकल्पना उदयाला आली. त्यानंतर 'राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण' (एनएचएआय) ने २०२० मध्ये 'नॅशनल हायवे इन्फ्रा ट्रस्ट' स्थापन करून निधी उभारला होता. त्याच धर्तीवर आता महाराष्ट्रात 'महा इनविट'अंतर्गत ट्रस्ट स्थापन करण्यात येईल. असा ट्रस्ट स्थापन करणारे महाराष्ट्र हे पहिलेच राज्य ठरले आहे. यामध्ये प्रायोजक, गुंतवणूक व्यवस्थापक, प्रकल्प व्यवस्थापक अशी रचना असणार आहे. मुंबई मेट्रो, नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळ, रेल्वे मल्टीमोडल लॉजिस्टिक पार्क तसेच वाढवण बंदरासारख्या प्रकल्पांद्वारे क्षेत्रीय विकासालाही गती दिली जाणार आहे. दुसऱ्या आणि तिसऱ्या श्रेणीतील शहरांमध्ये वेगवेगळे उद्योगधंदे यावेत, असा आग्रह धरण्यात आला आहे. गडचिरोलीला पोलादनगरी बनवली जात असून नागपूरमध्ये संरक्षण साहित्याचे उद्योगधंदे, अमरावती वस्त्र संकुल, छत्रपती संभाजीनगरमध्ये ईव्ही-इलेक्ट्रिक व्हेइकल्सचे उत्पादन केंद्र तर रायगड जिल्ह्यातील दिघी येथे स्मार्ट औद्योगिक शहर निर्माण केले जात आहे. एकूण, महाराष्ट्राचा विकास एका नवीन दिशेने घेऊन जाण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे दिसते. राज्य सरकारने आयटी, लॉजिस्टिक, ऑडिओ व्हिज्युअल गेमिंग कॉमिक्स, म्हणजेच एव्हीजीसी तसेच जीसीसी म्हणजेच जागतिक क्षमता केंद्र धोरणाद्वारे सेवाक्षेत्रालाही प्रोत्साहन दिले आहे.

सरकारतर्फे आता स्टार्टअप आणि सृजनशील उद्योगांना चालना देण्यासाठी इनोव्हेशन सिटी निर्माण केली जात आहे. हरित ऊर्जा, बायोटेक, ॲग्रोटेक आणि स्मार्ट उत्पादनावर आधारलेली एक नवी इको सिस्टीम तयार करण्याच्या करण्याचे धोरण आहे. तसेच ग्रामीण क्षेत्रात आयटीआयमधून जागतिक दर्जाचे कौशल्य दिले जावे, यासाठी खासगी-सरकारी भागीदारी योजनांना मंजुरी देण्यात आली आहे. २०३० पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक लाख कोटी डॉलर आणि २०४७ पर्यंत पाच लाख कोटी डॉलर करण्याचे प्रमुख उद्दिष्ट असेल, असे फडणवीस यांनी म्हटले आहे. हे सगळे स्वागतार्ह असले, तरी राज्याच्या डोक्यावर सध्या नऊ लाख कोटी रुपयांचे कर्ज असून वित्तीय तूट दोन लाख कोटी रुपयांवर गेली आहे. अशा वेळी भांडवली खर्च करण्यावर मुळात मर्यादा आली आहे. त्यामुळे योजना आणि त्यामागील उद्देश कितीही चांगले असले, तरी प्रत्यक्षात त्या दिशेने खर्च किती होऊ शकेल, याबद्दल चिंता वाटते. वेगाने प्रगती करण्यासाठी आर्थिक नियोजन करावेच लागते. म्हणूनच वित्तीय कामगिरीच्या आधारे राज्यांना केंद्राकडून करमहसुलाच्या विभाज्य वाट्यातून निधी मिळावा, अशी आग्रही मागणी महाराष्ट्र सरकारच्या वतीने सोळाव्या वित्त आयोगाकडे करण्यात आली. हा वाटा ४१ टक्क्यांवरून ५० टक्के करावा. याबरोबरच राज्यासाठी विशेष बाब म्हणून, केंद्राकडून एक लाख २८ हजार कोटी रुपये मिळावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. यात मुंबई महानगरसाठी ५० हजार कोटी रुपये तर नदीजोड प्रकल्पासाठी ६७ हजार कोटी रुपयांचा समावेश आहे. वित्त आयोगाने राज्याच्या मागणीची सहानुभूतीपूर्वक दखल घेतली पाहिजे. विविध प्रकल्पांसाठी एक लाख २८ हजार कोटी रुपयांची मागणीही करण्यात आली आहे. लोकसंख्येच्या आधारे राज्याला एकूण वाट्यापैकी २० टक्के निधी मिळावा आणि त्यातील प्रत्येकी दहा टक्के शहरी आणि ग्रामीण भागासाठी मिळावा, असे महाराष्ट्राचे आवाहन आहे. पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारसींनुसार राज्याला केंद्राकडून केंद्रीय करवाट्यातून ८० हजार कोटी रुपये मिळतात. सर्व राज्यांना मिळणाऱ्या वाट्यात राज्याचा हिस्सा ६.३१ टक्के आहे. हा वाटा थेट २० टक्क्यांवर न्यावा, असे आपल्याला वाटत असले तरी केंद्राला एवढी वाढ देणे शक्य होईल, असे दिसत नाही. कारण इतर राज्यांना डावलून, मागास राज्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करून महाराष्ट्राला इतक्या प्रमाणात झुकते माप देता येणे शक्य नाही. हे आपण नीट समजून घेतले पाहिजे. म्हणूनच महायुती सरकारने महसुली खर्च आटोक्यात आणला पाहिजे आणि त्यासाठी आपली सवंग धोरणे मोडीत काढली पाहिजेत. सध्या 'लाडकी बहीण योजने'च्या निमित्ताने राज्याची आर्थिक परिस्थिती आणि पैशांची चणचण चर्चेत आहेच. त्या पार्श्वभूमीवरही पैशांची तरतूद चर्चेत राहणार आहे.

# गुलजार, द ग्रेट!



भावनांना अस्खलित शब्दरुप देणारा गीतकार म्हणजे गुलजार. त्यांना अलिकडेच राहत्या घरी 'ज्ञानपीठ' पुरस्कार प्रदान केला गेला. सामान्यांच्या भावनांची नेमकी नस गवसलेला हा कवी अनेक चित्रपटांमधील गीतांमधून आपल्याला भेटतो आणि आशयघन मांडणीने भारुन टाकतो. मराठी मातीशी, मुंबईशी जुळलेला त्याचा स्नेहही अनोखा आहे. कुसुमाग्रजांच्या कवितांचे भाषांतर करुन त्याने तो दाखवून दिला आहे.

देशातच नव्हे तर जगात आपली ओळख निर्माण करणाऱ्या प्रख्यात कवी गुलजार यांना ज्ञानपीठ पुरस्कार प्रदान होणे ही त्याच्याबरोबरच प्रत्येक चाहत्यासाठी, संगीतप्रेमीसाठी आनंदाची बाब आहे, असे मला वाटते. 'गुलजार' असे एकेरी संबोधनच त्याच्यावरील अतीव आणि आंतरिक प्रेमाची साक्ष देण्यास पुरेसे आहे. हदी आणि उर्दूमध्ये कविता, गीते लिहिली असली तरी त्याची मराठीशी घट्ट नाळ जोडलेली असणे, हीदेखील आपल्याला त्याच्याशी जोडणारी एक मोठी बाब म्हणता येईल. गुलजार स्वत:देखील आपण महाराष्ट्राचे असल्याचे मानतो. त्याने सध प्रांत सोडला, रावी पार केले आणि मुंबईमध्ये संघर्षाचे सगळे दिवस काढले. इथेच त्याची कारकिर्द घडली, बहरली. या सगळ्यातून तो इथलाच होऊन गेला. त्यामुळेच त्याला मिळालेला हा सर्वोच्च सन्मान अधिक आपलासा वाटतो. वस्तुत: मोजकीच नावे अशी आपलीशी, आपल्यात मिसळून गेलेली वाटतात. त्यातील एक नाव म्हणजे निदा फाजली. जावेद अख्तर याचे नावही यात घ्यावे लागेल. पण याव्यतिरिक्त फारशी नावे पटकन आठवत नाहीत. असे असताना मराठी संस्कृती, भाषा, इथली माती या सगळ्याशी एकरुप, समरस झालेले हे नाव अधिक जवळचे वाटते.

असे सुरेख मिसळले गेल्यामुळेच गुलजार कुसुमाग्रजांच्या कवितांचे भाषांतर करु शकला तर, दुसरीकडे शांताबाईंनी त्याच्या 'त्रिवेणी'चे मराठीत भाषांतर केले. याचे त्याने तोंड भरुन कौतुकही केले. एकमेकांबरोबर असणारे असे नाते फार देखणे असते. तो मराठी वाचतो. आपल्याला उर्दू ऐकवतो. या अर्थाने तो कायमच खूप मराठीमय वाटतो. या संदर्भात बोलायचे तर आपण सत्यदेव दुबे यांच्या पंक्तीत त्याचे नाव घेऊ शकतो. दुबे हदी असले तरी आयुष्य संपूर्ण मराठी नाट्यसृष्टीला वाहून घेतले होते, तसेच गुलजारचेही आहे. तो उर्दू वा हदीला मानतो तेवढेच मराठीलाही मानतो. अन्यथा, कुसुमाग्रजांच्या कवितांचे भाषांतर करुन त्याच्यावर आधारित प्रयोग करण्याचे काम त्याच्या हातून झाले नसते. किशोर कदम आणि गुलजार एकत्रितपणे हा सुंदर प्रयोग करतात. त्यात सौमित्र मराठीत कविता वाचतो तर त्याचे हिंदी भाषांतर गुलजार वाचतो. यातून त्याचे मराठीप्रमाणेच कुसुमाग्रजांविषयीचे प्रेमही बघायला मिळते.

**गौरव**

**– अरुण म्हात्रे, प्रसिध्द कवी**

माझ्याप्रमाणेच आपल्यापैकी प्रत्येकाचा त्याच्या गाण्यांशी अगदी जवळचा, जिव्हाळ्याचा संबंध आहे. चित्रपटांमधील त्याची गाणी अनेकांच्या हृदयाचा ठाव घेणारी, त्याच्याशी जोडून ठेवणारी आहेत. काही कार्यक्रमांच्या निमित्ताने मंचावर एकत्र आलो असता त्यांच्याशी संवाद साधण्याचे प्रसंगही मला लाभले. अर्थातच वैयक्तिकदृष्ट्या ती माझ्यासाठी फार मोठी बाब आहे. त्याच्या गाण्यांविषयी काय आणि किती बोलणार...! 'बंदिनी' मधील त्याचे पहिले गाणे कोण विसरु शकेल? 'मोरा गोरा अंग लैलै...' पासून त्याच्या गाण्यांनी रसिकांच्या मनाचा ठाव घेतला, तो सिलसिला अजूनही संपलेला नाही. 'इजाजत', 'मौसम', 'आंधी'... किती यादी देणार? अनेक गाणी आपल्या ओठांवर असून ती त्याची आहेत तितकीच आपल्या प्रत्येकाची आहेत. ती सहज ओठांवर येतात. हलकेच गुणगुणावीशी वाटतात. कवी म्हणून मला नेहमी वाटते की गाणी लिहिणे ही एक कला आहे. यमके जुळवत काहींना ती जमते. बरेच गीतकार या पद्धतीने गाणी लिहितात. मात्र गुलजार असे कधीच करत नाही. त्याचे गाणे आशयाच्या अंगाने येते. त्याच्या कवितेत कृत्रीम गोष्टीदेखील जिवंत रुप घेऊन येतात. त्याच्या कवितेत रात्र ढळत नाही तर हातून निसटते. एखादा क्षण हातून हलकेच ओघळतो. त्याची कविता वाट बघणारी तिन्हीसांज दाखवते. काव्यशास्त्रामध्ये याला आम्ही 'व्यक्तिकरण' म्हणतो. ही बाब गुलजारला फार छान जमली आहे. म्हणूनच त्याच्या कवितेतील पाऊस आपल्याला जवळचा मित्र भेटावा तसा भेटतो. तो 'मेरा कोई सामान लौटा दो...' म्हणतो तेव्हा ते सामान आठवणी, भूतकाळातील घटना, सहवास या सगळ्यांचे गाठोडे असते. वस्तू, सामान, निसर्ग, आठवणी या सगळ्यांना व्यक्तिरुप देणारी, आपलेसे करणारी, अधिक जवळ आणणारी त्याची ही शैली फार देखणी आहे. म्हणूनच ती तुम्हा-आम्हा प्रत्येकाला आवडणारी आहे. याच हक्काने आपण त्याला एकेरी नावाने बोलवतो. शैलेंद्र, नीदा फाजली, साहिर यांच्या श्रेणीत बसणारे हे एक जवळचे नाव आहे. खरे सांगायचे तर, कवितेच्या प्रांतातील आम्ही सगळेच साहिरनंतर आदराने पाहतो ते नाव म्हणजे गुलजार.

'मेरे अपने' नावाचा चित्रपट आता मला आठवतो. यात हाती काम नसणाऱ्या युवकांच्या प्रश्नाला हात घातला होता. त्या काळात भारतभर बेरोजगार युवकांच्या चळवळी सुरू झाल्या होत्या. नोकरीसाठी तरुण वाट मिळेल तिथे पळत होते. या सगळ्याचे चित्रिकरण या चित्रपटात अगदी नेमकेपणाने दिसते. ही शिकलेली, तरुण मुले हाती काम नसल्यामुळे गुंडगिरीकडे कशी वळतात, त्यांचे गट कसे होतात, ते कसे गुन्हेगारी करु लागतात हे प्रभावीपणे सांगण्याचा प्रयत्न यामध्ये झालेला दिसतो. गुलजारची ग्रेट गोष्ट म्हणजे त्याने हे सगळे प्रत्यक्ष सुरू होते, त्याच काळात एका कथानकातून विषय रुपेरी पडद्यावर आणला. आपल्याकडे 'अधांतर' नावाचे नाटक जवळपास याच विषयावर बेतलेले आहे. पण ते रंगमंचावर यायला जवळपास २० वर्षे लागली. जयंत पवार यांनी ते लिहिले आणि गिरणी कामगारांचा प्रश्न मंचावर आणला. पण 'मेरे अपने' हा चित्रपट त्याच्या किती तरी आधी गुलजारने पडद्यावर आणला होता. यातील एक वृद्धा या तरुणांना सांभाळते आणि सन्मार्गी आणण्याचा प्रयत्न करते. पुढे 'अंकुश' मध्ये याच प्रश्नाला हात घालण्यात आला, पण गुलजारने त्याआधीच हाताला काम नसणाऱ्या युवकांच्या समस्येला तोंड फोडले. कोणी तरी आपल्याला आपले म्हणावे, ही या तरुणांच्या मनातील भावना त्याने शब्दांवाटे मांडली. गुलजारने अशा अनेक मानवी भावनांना वाट मोकळी करुन दिली.

'सब कुछ ठीक ठाक है...' हे त्याचे गाणेही असेच लक्षात राहिले आहे. खरे तर परिस्थिती अगदीच विपरित असते. काहीच नीट नसते. आयुष्य भरकटलेले असते. पण तरीही चित्रपटातील तरुण 'सब कुछ ठीकठाक है' म्हणतात तेव्हा एक प्रकारे परिस्थितीवर प्रहार होतो, नैराश्य व्यक्त होते आणि हे सगळे उपहासात्मक शैलीत होते. म्हणजेच कधी गुलजार पराकोटीच्या तरल शैलीत लिहिताना दिसतो तर दुसरीकडे तो असेही काही लिहून जातो. तो 'आंधी'मधील गाणी लिहितो आणि तोच नंतर 'बीडी जलै ले..' लिहितो. ही रेंज अफलातून आहे. खरेचच तो अस्सल मुंबईकर झाला आहे. मुंबईचे सगळे वातावरण त्याच्या रक्तात मिसळून घेतल्यामुळे तो करतो ते सगळे वर्णन सामान्य माणसाला जवळचे वाटते.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे गुलजारने एस.डी.बर्मन, सलिल चौधरी, लक्ष्मिकांत- प्यारेलाल, आर. डी. बर्मन, मदनमोहन पासून अगदी ए. आर. रेहमान यांच्याबरोबर काम केले आहे. ही रेंजदेखील असामान्य म्हणावी लागेल. कवी म्हणून गुलजारचा हा गुण मला अत्यंत मोलाचा वाटतो. गाणी लिहिताना संगीतकारांशी संबंध येतो तेव्हा प्रत्येकाची निकड वेगळी असते. प्रत्येक संगीतकार गाण्याचे वेगळे मीटर सांगत असतो. त्याला कसे गाणे हवे आहे, ते स्पष्ट करत असतो. सगळ्याच कवींना प्रत्येकाला हवे तसे गाणे देणे शक्य होत नाही. आपण 'तेथे पाहिजे जातीचे...' म्हणतो; तसे येथे असते. या धर्तीवर पाहता गुलजार सांगाल ते सगळे देणारा माणूस आहे, असे मला वाटतो. तो कोणत्याही मीटरमध्ये लिहू शकतो. कॅब्रे, प्रेमाचे गाणे, विरहाचे गाणे असे काहीही तो तेवढ्याच सहजतेने लिहू शकतो. आजही मी 'मिली' वा 'घर'मधील गाणी ऐकतो तेव्हा तो किती आपल्या मानसिकतेशी जोडलेला आहे, हे समजते. त्याची प्रत्येक ओळ आपल्या मनाने कधी ना कधी अनुभवलेली असते. म्हणूनच त्याची गाणी जाणकारांबरोबर सर्वसामान्यांनाही आवडतात. अभिजात, समिक्षक वर्गाला त्याचे काव्य आवडते, तसेच सामान्यातील सामान्यही त्याचा आस्वाद घेऊ शकतो. या कसोटीवर उतरत असल्यामुळेच गुलजार ग्रेट ठरतो.

# माजी मंत्री थोरातांच्या दूरदृष्टीतून जलसमृद्धी

## निळवंडेचे पाणी शेतात पोहोचताच संगमनेरात जल्लोष; गावागावात जलपूजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या जीवनात आनंद निर्माण व्हावा याकरता माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सतत पाठपुरावा करून धरण व कार्य पूर्ण केले आणि आता निळवंडे धरणाचे पाणी डावा आणि उजवा कालव्यांमार्फत शेतकऱ्यांच्या शेतात पोहोचले आणि संपूर्ण तालुक्यात जल्लोषाचे, आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले. या यशामागे उभा आहे. एक दूरदृष्टी संपन्न नेतृत्व असल्याने तालुका पाणीदार होत आहे.

निळवंडेच्या पाण्याचे गावागावांमध्ये जलपूजन, ढोल-ताशांच्या गजरात मिरवणुका, फटाक्यांची आतषबाजी आणि युवकांचा आनंदोत्सव. हा उत्सव म्हणजे केवळ जलपूजन नव्हते, तर एका स्वप्नपूर्तीचा साक्षात साक्षात्कार होता. शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी निर्माण होणार आहे.



बाळासाहेब थोरात यांनी मंत्री असताना विकासाचा आणि विशेषतः पाणी प्रकल्पांचा जो ध्यास घेतला, त्यातूनच निळवंडे धरण तसेच त्याला जोडलेले डावा आणि उजवा कालवे पूर्णत्वास गेले. या कार्यासाठी त्यांनी आमदारकी आणि मंत्रीपदाचीही तमा न बाळगता अविरत संघर्ष केला. त्यांच्या नेतृत्वामुळे आज दुष्काळी भागात पाणी पोहोचले असून, शेतकऱ्यांच्या आयुष्यात खराखुरा आनंद आला आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील १८२ गावांमध्ये आणि तळेगाव गटातील दुष्काळी भागांमध्ये निळवंडे धरणाचे पाणी पोहोचावे यासाठी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी धरणासह उजवा व डावा कालवा पूर्णत्वास नेले. पुढील टप्प्यात कामे हाती घेतली जाणार आहेत. प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतीला पाणी मिळावे, हा त्यांचा संकल्प होता. सत्ता बदलल्याने काही अडथळे निर्माण झाले, तरीही थोरात सातत्याने पाठपुरावा करत आहेत.

– इंद्रजीत थोरात

### गावोगावी उत्सवाचे वातावरण

अंभोरे, पानोडी, मालुंजे, पिंपरणे, चिंचोली गुरव, वरझडी, कासारे, लोहारे देवकवठे, मीरपुर, हिवरगाव पावसा, निमगाव टेंभी, देवगाव, वाघापूर, खराडी आदी गावांमध्ये जलपूजनाचे कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडले. शेतकऱ्यांनी मातीला पाणी लागल्याचा आनंद अश्रूंनी व्यक्त केला. मिरवणुका, फटाके, ढोल-ताशा, नारे या साऱ्या गोष्टींनी संपूर्ण परिसर न्हालून निघाला.

# अमृतेश्वर मंदिरात प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात

## धर्मादाय उपायुक्तांची उपस्थिती : मिरवणूक, होमहवन, प्रसाद वाटप कार्यक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : येथील अर्बन बँक चौकातील पुरातन अमृतेश्वर महादेव देवस्थान मंदिरात विविध देव-देवतांच्या मूर्तींची बुधवारी प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यानिमित्त महापूजा, होम हवन, मिरवणूक, महाआरती, प्रसाद आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अहिल्यानगरचे धर्मादाय उपायुक्त नवनाथ जगताप यांच्या हस्ते महाआरती झाली.

अमृतेश्वर मंदिर हे पुरातन मंदिर आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे आजोबा



मालोजीराजे भोसले यांनी हे मंदिर स्थापन केल्याचे उल्लेख इतिहासात आढळतात. १९५२ मध्ये या मंदिर देवस्थान ट्रस्टची स्थापना झाली.

या मंदिरात गणपती, मारुती, पार्वती, विठ्ठल-रुख्मिणी, दत्तात्रेयांच्या मूर्तींची वेद मंत्रांच्या जयघोषात स्थापना करण्यात आली. आशुतोष रेखी यांनी या सोहळ्याचे पौराहित्य केले. डॉ. दर्शन करमाळकर, पंकज पांड्या, राजेंद्र जोशी, पेठकर, यशवंत नवले, कुलकर्णी, गोपी कुलकर्णी, योगेश सुपेकर, सचिन पेठकर आदींसह ११ दाम्पत्यांना महापुजेचा मान देण्यात आला होता.

यावेळी जगताप यांचा देवस्थान विश्वस्त मंडळाने सत्कार केला. यावेळी विश्वस्त नंदिनी जोशी, सतीश सुपेकर, रवींद्र शित्रे, सुनील शिंदे, देवस्थानचे कायदेशीर सल्लागार अँड. गौरव मिरीकर आदींची उपस्थिती होती.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

### ...अन् खोटे आरोप थांबवा

समर्थन केले आहे. काँग्रेस प्रवक्त्यांनी म्हटले की, राहुल गांधींनी निवडणूक प्रक्रियेतील त्रुटींकडे लक्ष वेधले आहे. निवडणूक आयोगाने या आरोपांची गंभीर दखल घ्यावी. राहुल गांधींच्या निवडणूक प्रक्रियेवरील आरोपांमुळे राजकीय वातावरण तापले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या आरोपांना जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. आगामी काळात या विषयावर आणखी राजकीय घडामोडी घडण्याची शक्यता आहे.

### एकनाथ शिंदे बोलतात कमी, पण काम परफेक्ट

संभाजी कदम, दिलीप सातपुते, कमलाकर कोते, नितीन औताडे, नगर तालुका प्रमुख अजित दळवी, रामदास भोर, मनोहर पोटे, नंदकुमार ताडे, सागर बेग, माजी महापौर शिलाताई शिंदे, सुरेखा कदम, रोहिणीताई शेंडगे, माजी नगरसेविका अश्विनी जाधव, संपर्क प्रमुख उज्वलाताई भोपळे, शोभाताई अकोलकर, माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे, गणेश कवडे, संजय शेंडगे, सचिन शिंदे, आप्पा नळकांडे, संतोष ग्यानप्पा, परेश लोखंडे, दत्ता कावरे, युवा सेनेचे राज्य संघटक बाजीराव चव्हाण, प्रशांत गायकवाड, दिपक खैरे, संग्राम कोतकर, बबलू शिंदे, दशरथ शिंदे, आशुतोष डहाळे, बापूसाहेब नेटके, कैलास माने, संदेश कार्ले, शरद झोडगे, दिलीप पवार, युवा सेनेचे जिल्हा प्रमुख योगेश गलांडे, आकाश कातोरे, साईनाथ आधाट, महेश लोंढे, ओंकार शिंदे, अमोल होंबे, सुरेखा गव्हाणे आदी उपस्थित होते. पुढे देसाई म्हणाले की, शिवसेनेत शिस्तबद्ध काम सुरु आहे. सक्रीय सदस्यांना संधी दिली जाणार आहे. प्रास्ताविक संभाजी कदम यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र टाक यांनी केले. आभार दिलीप सातपुते यांनी मानले.

### सीना नदी सुशोभीकरण काम पूर्णत्वाकडे

संतोष लांडे, भूपेंद्र परदेशी आदी उपस्थित होते. आ. संग्राम जगताप पुढे म्हणाले की, शहरातून सिना नदीचा १३ किलोमीटरचा प्रवाह जात असून सन २००९ मध्ये महापौर असताना राज्य शासनाच्या माध्यमातून सिना नदी सुशोभीकरणासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. काम देखील सुरू झाले होते. परंतु, काही राजकीय लोकांकडून विरोध झाला आणि ते काम बंद पडले, त्यानंतर अहिल्यानगर शहरातील जनतेने विधानसभेची जबाबदारी माझ्यावर टाकली. काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या पाठीमागे मतरुपी जबाबदारी दिली आणि २०१६ मध्ये नदीपात्राच्या प्रश्नासंदर्भात विधानसभेत आवाज उठविला. तेव्हापासून पाठपुरावा सुरू केला आणि त्यानंतर सीना नदीचे पात्र मोजण्याचे व हद्द निश्चितीचे काम पूर्ण झाल्यानंतर सिनानदी सुशोभीकरण कामाला वेग आला. सीना नदी पहिल्या टप्प्याचे काम पूर्णत्वाकडे जात आहे. पुणे रोड लगतच्या सीना नदी सुशोभीकरणाचे काम सुरू असून या ठिकाणी नागरिकांना पायी चालण्यासाठी जॉगिंग ट्रॅक तयार करण्यात आला आहे. या परिसरातील नागरिकांना मनोरंजनासाठी येता येणार आहे. पुढील काही वर्षांमध्ये सीना नदीचे रूप पालटल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. नागरिकही आता सुरू असलेल्या कामाबाबत समाधान व्यक्त करत आहे, असे ते म्हणाले.

### ...त्वरीत काम सुरू करा : डांगे

आदेश देण्यात आलेले आहेत. केडगाव अमरधाम स्मशानभूमी येथील जाळ्या बसविण्याबाबत तत्काळ प्रशासकीय प्रक्रिया करून काम सुरू केले जाईल, स्मशानभूमीत इतर सुविधांच्या सुधारणेबाबतही लवकरच कार्यवाही केली जाईल, असे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले.

### सध्या राजकारणात निष्ठेला महत्त्व नाही : आदिक

राजकारणामध्ये निष्ठेला महत्त्व राहिले नसले, तरी आदिक साहेबांवर ते गेल्यानंतर दहा वर्षानंतरही निष्ठा असणारी काही माणसे आहेत. धुळे येथील काही युवक २०१२ ला दिल्ली येथे पोलीस भरतीसाठी गेले होते. तेथे ते आदिक साहेबांना भेटले. त्यांना राहण्याची व्यवस्था नव्हती. साहेबांनी महाराष्ट्र सदनमध्ये त्यांची राहण्याची व्यवस्था केली येथे आलेले हेमंत सूर्यवंशी व त्यांचे इतर सहकारी त्या ठिकाणी राहिले. हेमंत यांचे सहकारी पोलीसमध्ये भरती झाले. मात्र हेमंत भरती झाले नाही. त्यांची साहेबांवरील निष्ठा साहेब गेल्यानंतर दहा वर्षांनी तशीच आहे. हे येथील कार्यकर्त्यांच्या डोळ्यात अंजन घालणारे आहे. यावेळी माजी नगराध्यक्षा अनुराधाताई आदिक म्हणाल्या की, दरवर्षी महाराष्ट्र कृषक समाज संघटनेच्या वतीने आदिक साहेबांच्या पुण्यतिथी निमित्त विविध प्रकारचे आरोग्य शिबिरे घेतली जातात. या शिबिरातून एखादा रुग्ण बरा झाल्यास तीच खरी साहेबांची यानिमित्ताने आठवण असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. यासाठी साखर कामगार रुग्णालय व एसएमबीटी रुग्णालय नेहमीच सहकार्य करते, असे त्यांनी सांगितले. यावेळी माजी आ. लहू कानडे व ज्येष्ठ नेते बापूसाहेब सदाफळ यांची भाषणे झाली. यावेळी पोलीस उपाधीक्षक डॉ. बसवराज शिवपुजे, पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, डॉ. राहुल कुलकर्णी, डॉ. गणेश जोशी, डॉ. सातपुते, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अरुण पाटील नाईक, फारुख पटेल, उत्तमराव पवार, रामभाऊ औताडे, रमेश कोठारी, भागचंद औताडे, दत्तात्रय औताडे, प्रभाकर पटारे, नामदेव आदिक, निलेश आदिक, ज्ञानदेव आदिक, पोपटराव आदिक, भगवान आदिक, अँड.तुषार आदिक, विलास कवडे, अरुण कवडे, मधुसूदन औताडे, वसंतराव पवार, दीपक निंबाळकर, सुधाकर बोंबले, अमन शेख, अँड. संदीप चोरगे, लक्ष्मण धोत्रे, कार्लस साठे, डॉ. घोडे, राजेंद्र गवारे, हरिभाऊ रेवाळे, भरत जाधव, कैलास बोर्डे, पी. आर. शिंदे, विष्णुपंत खंडागळे आदी मान्यवर उपस्थितीत होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीता फासाटे यांनी केले.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, ※ कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11

# विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्न पहावीत

## आदिवासी विकास प्रकल्पातंर्गत विद्यार्थी गुणगौरव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** विद्यार्थ्यांनो मोठी स्वप्न पहा व स्वप्नांचा पाठलाग करा, असा सल्ला आ. किरण लहामटे यांनी दिला. तसेच आश्रमशाळांची गुणवत्ता सुधारत असल्याबाबत समाधान व्यक्त केले.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय राजूर येथे दहावी व बारावी शालांत परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा नुकताच संपन्न झाला. यावेळी डॉ. लहामटे अध्यक्षस्थानावरून बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे उपस्थित होत्या. यावेळी प्रकल्पातंर्गत असणाऱ्या २१ शासकीय व १७ अनुदानित आश्रमशाळांमधून प्रथम आलेल्या अनुक्रमे ३ मुले व ३ मुली यांचा सत्कार करण्यात आला. तर दहावी व बारावी शाळेत प्रथम येणाऱ्यास पाच हजार रुपये, द्वितीय तीन हजार पाचशे रुपये व तृतीय क्रमांकास अडीच हजार रुपये बक्षीस देण्यात आले.



यावेळी १०० टक्के निकाल असणाऱ्या आदर्श मवेशी, कोहणे, म्हसबंडी, शिरपुंजे, पळसुदे, तिरडे, पैठण येथील शासकीय आश्रमशाळांचे मुख्याध्यापक व विषय शिक्षक यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. देवठाण, शेंडी, एकदरे, चांदेकसारे व कोळवाडे येथील अनुदानित आश्रमशाळेचे मुख्याध्यापक व विषय शिक्षक यांचाही प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

बारावी विज्ञान शाखेचा केळी रुम्हणवाडी, पैठण, अकलापूर, पिंपरकणे, केळी कोतूळ या शासकीय आश्रमशाळांचा निकाल १०० टक्के लागल्याने प्राचार्य व विषय शिक्षक यांना सन्मानित करण्यात आले. बारावी कला शाखेत शासकीय आश्रमशाळांपैकी केळी रुम्हणवाडी, पैठण, केळी कोतूळ तर अनुदानित आश्रमशाळांपैकी सारोळेपठार येथील अनुदानित आश्रमशाळेतील प्राचार्य व विषय शिक्षक यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून प्रकल्प कार्यालयाच्या परिसरात आमदार डॉ. लहामटे, प्रकल्प अधिकारी बोकडे, उपविभागीय कृषी अधिकारी प्रवीण गोसावी, जलसंधारण अभियंता विकास पवार यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी सहायक प्रकल्प अधिकारी मनोज पैठणकर, तुषार पवार, कार्यालयीन अधीक्षक श्याम कांबळे, सुनील मोरे, मुख्याध्यापक संगीता कुलथे, सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) दीपक कालेकर शिक्षण विस्तार अधिकारी अंबादास बागुल उपस्थित होते.

## खंडाळा येथील वेश्याव्यवसायावर छापा; दोघांना पकडले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** खंडाळा (ता. अहिल्यानगर) येथील हॉटेल राजयोग येथे सुरू असलेल्या वेश्याव्यवसायावर स्थानिक गुन्हे शाखेने छापा टाकून दोघांना पकडले असून, तीन महिलांची सुटका करण्यात आली आहे. या प्रकरणी अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अक्षय अनिल कर्डिले (वय २८, रा. खंडाळा) हा हॉटेल राजयोग येथे महिलांकरवी कुंटणखाना चालवत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळाली होती. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशाने पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस निरीक्षक राजेंद्र इंगळे, पोलीस उपनिरीक्षक तुषार धाकराव, पोलीस अंमलदार गणेश धोत्रे, अरूण गांगुर्डे, संतोष खैरे, रवींद्र घुंगासे, भगवान थोरात, सारिका दरेकर व उमाकांत गावडे यांच्या पथकाने सदर ठिकाणी जावून बनावट ग्राहक पाठवून वेश्याव्यवसाय सुरू असल्याची खात्री घेतली. त्यानंतर पंचासमक्ष छापा टाकण्यात आला. कारवाईदरम्यान, नारायण ठाणप्रसाद भट्टराई (वय २७, रा. कोहलपूर, बाके, नेपाळ) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून एक हजार ५०० रूपये रोख रक्कम जप्त करण्यात आले. हॉटेलमधील तपासणीत तिन्ही महिलांची सुटका झाली असून, त्यांनी अक्षय कर्डिले याने वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडल्याचे सांगितले. या कारवाईत अक्षय कर्डिले यालाही ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याकडून एक लाख रूपये किंमतीचा मोबाईल जप्त करण्यात आला आहे.

## शहीद स्मारकाचे बुधवारी लोकार्पण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** सैनिक कल्याण कार्यालय, अहिल्यानगर येथे बुधवार दि. ११ जून २०२५ रोजी सकाळी ठिक १० वाजता भव्य दिव्य असे शहीद स्मारक अनावरण व लोकार्पण सोहळा संपन्न होणार आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात शहीद सैनिकांच्या स्मरणार्थ एक भव्य शहीद स्मारक आणि सैनिक विश्राम गृहाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात अनेक प्रतिष्ठित पाहुण्यांचा समावेश असणार आहे. प्रमुख्य उपस्थिती जनरल विक्रम वर्मा, सेना मेडल, विशिष्ट सेवा मेडल, बार, कमांडेंट आर्मड कोर सेंटर आणि स्कूल, डॉ. पंकज आशिया, जिल्हाधिकारी, अहिल्यानगर, पद्मश्री डॉ.पोपटराव पवार, कार्याध्यक्ष, आदर्शगाव संकल्प व प्रकल्प समिती महाराष्ट्र राज्य, ब्रिगेडियर सुनील कुमार, सेना मेडल, बार, स्टेशन कमांडर, स्टेशन मुख्यालय अहिल्यानगर, आनंद भंडारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर, सोमनाथ घार्गे, जिल्हा पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर, आदर्शगाव हिवरेबाजार येथील





एनसीसी छात्र यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. कार्यक्रमात प्रामुख्याने वीरपत्नी, वीरमाता आणि वीरपिता यांचा सन्मान केला जाणार आहे, माजी सैनिकांनी समाजासाठी केलेल्या अति विशिष्ट काम ाबद्दल त्यांचा सन्मान केला जाणार आहे, शहीद स्मारकाचे उद्घाटन, सैनिक विश्राम गृहाचे उद्घाटन, साईदीप हॉस्पिटल चे फ्री मेडिकल चेकअप कॅम्प होणार आहे. कार्यक्रमांस जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक, सैनिकांचे नातेवाईक आणि नागरिकांना या ऐतिहासिक कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी विद्यासागर कोरडे व सहाय्यक अधिकारी चंद्रकांत यांनी केले आहे.

## शिवराज्याभिषेक दिन श्रीरामपुरात साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** अखंड मराठा समाजाच्या वतीने श्रीरामपुरात छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५१ वा शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करत करण्यात आले. यावेळी अखंड मराठा समाजाचे ज्येष्ठ पंडितराव बोंबले, अण्णासाहेब डावखर, प्रमोद भोसले, ॲड. बाळासाहेब आगे, नागेश सावंत, सुरेश कांगुणे, राजेंद्र मोरगे, शरद नवले, सुधाकर बोंबले, जयवंत घोडके, नितीन गवारे, संदीप बोंबले, समीर बोर्डे, नितीन कासार, संजय बोंबले, रमेश घुले, अतुल साळवे, गाडे पाटील, राजेंद्र दाणे, गणेश राशिनकर, अमोल बोंबले आदी उपस्थित होते. रायगडावर ३५० वर्षापूर्वी राज्याभिषेकाच्या वेळी शिवाजी महाराजांनी छत्रपती हे पद धारण केले होते. त्याचबरोबर एका सार्वभौम राज्याची घोषणा केली होती. त्यामुळे महाराजांचा राज्याभिषेक हा अत्यंत व्यापक आणि भारताच्या इतिहासातील एक महत्त्वाचा प्रसंग होता.

## कृषीच्या दोन पदनामात बदल

**अहिल्यानगर :** राज्यातील कृषी पर्यवेक्षक व कृषी सहाय्यक यांच्या पदनामात बदल करण्याचा निर्णय राज्य सरकारच्या कृषी, पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागाने घेतला आहे. कृषीच्या पदनामात बदल केला असला तरी संबंधित कर्मचाऱ्यांच्या वेतन व सेवांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही, असे कृषी विभागाच्यावतीने सांगण्यात आले.

केंद्र शासनाचा ॲग्रीस्टॅक हा महत्त्वाचा प्रकल्प असून, या प्रकल्पांतर्गत ॲग्रीस्टॅक हे राज्यातील कृषी क्षेत्रात डेटा आणि डिजिटल सेवा वापरून शासनाच्या विविध योजनांचा लाभार्थी शेतकर्यांपर्यंत जलद गतीने व परिणामकारकरित्या पोहचवण्यासाठी स्थापित केले जाणारे डिजिटल फाउंडेशन आहे. ग्रामस्तरावर याबाबतचे महत्त्वाचे कामकाज करण्याची जबाबदारी कृषी सहाय्यकांवर सोपविण्यात आलेली आहे. कृषी विभागांतर्गत कृषी पर्यवेक्षक व कृषी सहाय्यक यांच्या पदनामात बदल करण्याबाबत विविध संघटनांकडून मागणी होत आहे. विविध संघटनांनी केलेली मागणी व त्यानुसार आयुक्त (कृषी) यांनी प्रस्तावित केल्यानुसार कृषी पर्यवेक्षक व कृषी सहाय्यक यांचे पदनाम सुधारून अनुक्रमे उप कृषी अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकारी असे बदलण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. त्यास अनुसरून राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीतील मान्यतेनुसार शासनाने कृषी पर्यवेक्षक व कृषी सहाय्यक यांचे पदनाम अनुक्रमे उप कृषी अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकारी असे बदलण्यास मान्यता दिली आहे. या पदनाम बदलामुळे भविष्यात वेतनश्रेणी वाढ संदर्भात प्राप्त होणारी कोणतीही मागणी विचारात घेतली जाणार नाही. तसेच, पदनाम बदलानंतर वेतनश्रेणी / वेतनस्तर देण्याच्या अनुषंगाने भविष्यात वेतनत्रुटी समितीपुढे मागणी करता येणार नाही आणि अशी मागणी विचारात घेतली जाणार नाही. या अटीच्या अधीन राहून पदनाम बदल करण्यात आला आहे.

## १८ वर्षीय तरूण बाथरूमध्ये डोकावला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी तालुक्यातील एका गावात राहणाऱ्या १७ वर्षीय तरुणीला शेजारी राहणाऱ्या १८ वर्षीय तरुणाकडून गेल्या काही महिन्यांपासून पाठलाग, छेडछाड आणि धमकी देण्याच्या घटना घडल्या. शनिवारी (ता. ७) सकाळी हा तरुण तरुणीच्या घराच्या बाथरूमजवळील किचनच्या पत्र्यावर चढून डोकावताना आढळला. याप्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

७ जून रोजी सकाळी ८ वाजता अल्पवयीन मुलगी अंघोळ करत असताना तरुण किचनच्या पत्र्यावरून डोकावून पाहत होता, ज्यामुळे तिला व तिच्या कुटुंबीयांना धक्का बसला.जानेवारी २०२५ पासून हा तरुण तरुणीला स्कूटीवरून कॉलेजला जाताना रस्त्यात अडवून बळजबरीने बोलण्याचा प्रयत्न करत होता.

फेब्रुवारीत बारावीच्या परीक्षेदरम्यान, हिंदीच्या पेपरला जाताना त्याने तरुणीचा हात पकडून लज्जास्पद वक्तव्य केले आणि तक्रार केल्यास जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिली. भीतीपोटी तरुणीने घरच्यांना याबाबत काही सांगितले नाही. शनिवारी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास तरुणी बाथरूममध्ये अंघोळ करत असताना हा तरुण किचनच्या पत्र्यावर चढून डोकावत होता. तरुणीने आरडाओरड केल्यानंतर तिची आई धावत आली आणि तिनेसुद्धा हा प्रकार पाहिला. घरच्यांनी आणि शेजाऱ्यांनी तरुणाला पकडले, संतप्त जमावाने त्याला मारहाण केली. यानंतर तरुणीने कुटुंबीयांसह पाथर्डी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

पाथर्डी पोलीस ठाण्यात तरुणाविरुद्ध छेडछाड, धमकी आणि लज्जास्पद वर्तनाप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी तपास सुरू केला असून, या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. तरुणीच्या तक्रारीनुसार पोलिसांनी गुन्हा नोंदवण्यात आला आहे.अशा घटनांमुळे तरुणींच्या शिक्षणावर आणि मानसिक स्वास्थ्यावर परिणाम होऊ शकतो. पोलिसांनी तत्परतेने कारवाई करून दोषींना कठोर शिक्षा होईल, याची खात्री करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

## रासने फाउंडेशनच्या विद्यार्थ्यांना मिळणार मदत-आ.जगताप

### शासनाकडून मिळवून दिली ४ लाखांची मदत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** मागील मे महिन्यामध्ये शहरालगत ढगफुटी सदृश्य पावसाने हाहाकार केला होता. यामध्ये सारसनगर मधील तन्वी केदार रासने या १८ वर्षीय युवतीचा स्लॅब कोसळून जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला होता. तसेच परिसरातील नागरिकही तन्वीच्या जाण्याने शोक व्यक्त करत होते. नुकतीच तिने बारावी परीक्षा दिली होती. तिला ८६ टक्के गुणही मिळाले होते. अभ्यासात हुशार असणारी विद्यार्थिनी म्हणून तिची ओळख होती, रासने कुटुंब



हे सदन असून त्यांनी मुलीच्या नावे ट्रस्ट स्थापन केले आहे. त्या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत केली जाणार आहे. रासने कुटुंबीयांनी सामाजिक उपक्रमाचा घेतलेला निर्णय समाजाला दिशादर्शक आहे अशी भावना आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केली.

स्व. तन्वी केदार रासने कुटुंब यांना शासनाच्या माध्यमातून ४ लाख रुपये आर्थिक मदतीचा धनादेश आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते सुपूर्त करण्यात आला. यावेळी माजी उपमहापौर गणेश भोसले, प्रांताधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार संजय शिंदे, माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, वडील केदार रासने, आई वैशाली रासने आदी उपस्थित होते.

आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून आमच्या कुटुंबियांना चार लाख रुपयांची आर्थिक मदत झाली आहे, मात्र ही मदत मुलगी स्व. तन्वी रासने हिच्या नावे फाउंडेशन स्थापन करून विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत केली जाणार आहे, जोरदार पावसामुळे स्लॅब कोसळून मुलीचा दुर्दैवी मृत्यू झाला. यावेळी आमदार संग्राम जगताप, माजी उपमहापौर गणेश भोसले, माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे व परिसरातील नागरिकांनी तातडीने मदत मिळून दिली व आधार देण्याचे काम केले असल्याची भावना वडील केदार रासने यांनी व्यक्त केली.

## जिल्ह्यात अकरावीसाठी ५२ हजार विद्यार्थ्यांची नोंदणी

### तात्पुरती गुणवत्तायादी जाहीर; हरकती घेता येणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** यंदा अकरावीचे प्रवेश ऑनलाइन होत असून अर्ज दाखल करण्याच्या २६ मे ते ५ जून या कालावधीत जिल्ह्यातील ५२ हजार २३२ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पोर्टलवर नोंदणी केली आहे. आता तात्पुरती गुणवत्ता यादी जाहीर झाली असून त्यावर हरकती, दुरुस्तीत दोन दिवसांचा कालावधी आहे. त्यानंतर अंतिम गुणवत्तायादी ८ जून रोजी जाहीर होणार आहे.

वर्ष २०२५-२६ पासून संपूर्ण राज्यामध्ये उच्च माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता ११ वीचे प्रवेश केंद्रीय ऑनलाइन प्रणालीद्वारे सुरू करण्यात आलेले आहे. ११ वी प्रवेशप्रक्रियेसाठी ८ जून रोजी अंतिम गुणवत्ता यादी जाहीर होणार आहे. जिल्ह्यातील ४३२ उच्च माध्यमिक विद्यालयांनी नोंदणी केली होती. ऑनलाइन विद्यार्थी नोंदणीसाठी २६ मेपासून संकेतस्थळावर सुरुवात झाली होती. प्रारंभी २ जूनपर्यंत असलेली मुदत वाढवून ५ जून रोजी दुपारी २ वाजेपर्यंत करण्यात आली. या मुदतीत जिल्ह्यात ५२ हजार २३२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. त्याच दिवशी म्हणजे ५ जूनलाच तात्पुरती गुणवत्तायादी पोर्टलवर जाहीर होणार होती. मात्र, ती सायंकाळपर्यंत दिसत नव्हती. ती ६ जूनला प्रसिद्ध झाली.



**यादीवर अक्षेप घेता येणार**

प्रसिध्द झालेल्या यादीवर काही आक्षेप, तक्रारी असतील तर दि. ६ व ७ जून या कालावधीत विद्यार्थी आपल्या लॉगिनमध्ये जाऊन ती नोंदवू शकतो. विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून या तक्रारींचे निवारण झाल्यानंतर ८ जून रोजी अंतिम सर्वसाधारण गुणवत्तायादी प्रसिद्ध होणार आहे.

## जिल्ह्यात दोन दिवस यलो अलर्ट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** जिल्ह्यात मे महिन्यात जोरदार अवकाळी पाऊस बरसल्यानंतर जून महिन्यांच्या सुरुवातीपासूनच पावसाने उघडीप दिली होती. मात्र, मागील दोन दिवसांपासून पुन्हा पावसाला पोषक वातावरण तयार झाले असून, ८ जूनपर्यंत भारतीय हवामान विभागाने अहिल्यानगर जिल्ह्यासाठी पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे.

दरम्यान, दिवसभर उन्हाचा चटका आणि रात्रीच्या वेळी उकाड्यात वाढ झाली असून, यामुळे पावसासाठी पोषण तयार होताना दिसत आहे. यंदा मे महिन्यात जिल्ह्यात २२० मिमी पावसाची नोंद झाली आहे. विशेष करून जिल्ह्याच्या दक्षिण भागातील तालुक्यात दमदार पाऊस झाला. उत्तर नगर जिल्ह्यात या पावसाचे प्रमाण कमी आहे. दरम्यान मान्सूनचा वेग कमी झाल्याने गेल्या पाच दिवसांपासून जिल्ह्यातील पावसात खंड दिसत आहे. जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जिल्ह्यात केवळ ६.३ मिमी पावसाची नोंद झाली आहे. सध्या पावसाचे पुन्हा जिल्ह्यात आगमन होण्याचे चित्र असून, भारतीय हवामान विभागाने ८ जूनपर्यंत जिल्ह्याला पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. शुक्रवारी सायंकाळी नगर शहरासह जिल्ह्याच्या काही भागांत हलक्या स्वरूपात पाऊस झाला.

## बेलापूरमध्ये १००१ घरकुलांना मंजुरी; मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे सहकार्य

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बेलापूर :** पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पा. व माजी खासदार सुजय विखे पा. यांच्या विशेष सहकार्याने तसेच जिल्हा परिषद सदस्य शरद नवले, बाजार समितीचे उपसभापती अभिषेक खंडागळे यांचे प्रयत्नातून मोदी आवास योजने अंतर्गत ग्रामपंचायतीच्या इतिहासात पहिल्यांदाच एकाच वेळी बेलापूर-ऐनतपूर येथील तब्बल १००१ नागरिकांना घरकुले मंजूर होण्याची ऐतिहासिक विक्रमी कामगिरी केल्याची माहिती सरपंच मिना साळवी व उपसरपंच प्रियंका कुऱ्हे यांनी दिली.

बेलापूर-ऐनतपूर येथील गरजू नागरिकांना मोदी आवास योजने अंतर्गतच्या घरकुलांचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या प्रस्तावास मंजुरी मिळावी यासाठी शरद नवले, अभिषेक खंडागळे, माजी सरपंच स्वाती अमोलिक, माजी उपसरपंच मुस्ताक शेख, तबसुम बागवान, ग्रामपंचायत अधिकारी निलेश लहारे यांनी नामदार राधाकृष्ण विखे पा. यांच्या माध्यमातून शासनाकडे पाठपुरावा केला होता. यासंदर्भात नामदार विखे पा. यांचे सहकार्याने ग्रामविकास मंत्री नामदार जयकुमार गोरे यांचे समवेत बैठकही झाली होती. या बैठकीत घरकुलांबाबत सविस्तर चर्चा होवून प्रस्तावास मंजुरी देण्याची विनंती करण्यात आली होती. अखेर या प्रयत्नास यश येवून बेलापूर ग्रामपंचायतीच्या इतिहासात पहिल्यांदाच एकाचवेळी एक हजार एक घरकुलांना मंजुरी मिळाली.



हा घरकुल मंजुरीचा आजवरचा विक्रम आहे. सदरची मंजुरी मिळाल्याने एक हजार कुटुंबाच्या हक्काच्या घरांचा प्रश्न मार्गी लागणार आहे. सदरच्या मंजूर घरकुलां पैकी ज्या लाभार्थ्यांकडे स्वतःची जागा नाही त्यांच्यासाठी नामदार विखे पा. महसूल मंत्री असताना त्यांनी शेती महामंडळाची जमिन ग्रामपंचायतीला मोफत दिली आहे. याच जमिनीवर सर्व सुविधायुक्त घरकुल वसाहत साकारली जाणार आहे.

सदरच्या एक हजार एक घरकुलांच्या प्रस्तावास मंजुरी देवून बेलापूर-ऐनतपूर येथील गरजू नागरिकांच्या घराची स्वप्नपूर्ती केल्याबद्दल ना. राधाकृष्ण विखे पा., माजी खासदार सुजय विखे पा. यांना शरद नवले, अभिषेक खंडागळे, सरपंच मिना साळवी, उपसरपंच प्रियंका कुऱ्हे, माजी सरपंच स्वाती आमोलिक, माजी उपसरपंच मुश्ताक शेख, तबसुम बागवान, ग्रामपंचायत सदस्य उज्वला कुताळ, चंद्रकांत नवले, वैभव कुऱ्हे, सुशिलाबाई पवार यांचेसह घरकुलाचे लाभार्थींनी धन्यवाद दिले आहेत.

# माजी मंत्री थोरातांमुळेच निळवंडे धरणाचे पाणी

## राज्य साखर संघाचे उपाध्यक्ष बाबा ओहोळ; तळेगाव भागात निळवंडे धरणाचे पाणी आल्याने नागरिक सुखावले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**तळेगाव दिघे :** दुष्काळी भागातील शेतकरी व नागरिकांना निळवंडे धरणाचे पाणी मिळावे याकरता माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी धरण व कालवे पूर्ण केले. अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर कालव्यांद्वारे विविध बंधाऱ्यांमध्ये पाणी आल्याने तळेगाव परिसरातील गावांमध्ये जलसमृद्धी निर्माण झाली असून शेतकरी आनंदी झाला आहे. हे पाणी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्यामुळेच आल्याचे गौरवोद्गार राज्य साखर संघाचे उपाध्यक्ष बाबासाहेब ओहोळ यांनी काढले आहे.

> उजव्या व डाव्या कालव्यातून पाणी आल्यानंतर सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या यंत्रणेने शेतकऱ्यांना मोठी मदत केली. गावोगावची तळी भरण्याकरता सारी निर्माण केली याचबरोबर दोन कोटीच्या पाईपच्या माध्यमातून अनेक ठिकाणी पाणी उचलले गेले त्यामुळे तालुक्यामध्ये जलसमृद्धी वाढली आहे. पाणी देणारे माजी मंत्री बाळासाहेब थोरात असून आगामी काळात सर्वांनी त्यांच्याच पाठीशी उभे राहावे.
>
> **– संपतराव गोडगे**

वरझडी, लोहारे, कासारे, मिरपूर येथे निळवंडे च्या डाव्या कालव्यातून आलेल्या पाण्याने भरलेल्या बंधाऱ्यांची पूजन करताना ते बोलत होते. या प्रसंगी कारखान्याचे संचालक संपतराव गोडगे, बाबा ओहोळ, प्रभाकर कांदळकर, डॉ. संदीप गोर्ड, कारभारी गोर्ड, आप्पासाहेब गोर्ड, मुरलीधर



वेताळ, बाबासाहेब गोर्ड, बाळासाहेब गोर्ड, काशिनाथ काळे, दत्तात्रय कार्ले, शिवाजी कार्ले, गणपत कार्ले, सोमनाथ कार्ले, वाल्मीक गायकवाड, विठ्ठलराव कार्ले, ज्ञानदेव शेळके आदि मान्यवर उपस्थित होते.

बाबा ओहोळ म्हणाले की, १९९९ मध्ये खऱ्या अर्थाने मिळवणे धरणाच्या कामाला गती मिळाली माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी रात्रंदिवस या कामासाठी पाठपुरावा केला. आधी पुनर्वसन मग धरण मार्गी लावताना लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या शेतावरील पुनर्वसनाचा शेरा सुद्धा उठविला.

याचबरोबर कोरोना संकटातही कालव्यांचे कामे सुरू ठेवून डावा आणि उजवा कालवा पूर्ण केला. ज्यांनी कामात योगदान दिले नाही, ती मंडळी आता काही ठिकाणी श्रेय घेण्याचा प्रयत्न करत आहे. परंतु जनतेला माहित आहे काम कोणी केले आणि अडचणी कोणी निर्माण केल्या. माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्यामुळेच तळेगाव भागात पाणी आले असल्याचे ते म्हणाले. याप्रसंगी वरझडी कासारे लोहारे येथे युवकांनी मोठ्या आनंदोत्सवात पाणी पूजन केले.

# 'आयटीआय'ला संत शिरोमणी गोदड महाराजांचे नाव

## सभापती प्रा. राम शिंदे यांच्याकडे केला होता सातत्याने पाठपुरावा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक दिनाच्या पावन निमित्ताने कर्जत येथे एक ऐतिहासिक व अभिमानास्पद क्षण अनुभवायला मिळाला. येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था म्हणजेच आय.टी.आय. या संस्थेला आता अधिकृतपणे ग्रामदैवत संत शिरोमणी गोदड महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था असे नाव देण्यात आले. या नामकरणाचा शुभारंभ राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने झाला.

या प्रशिक्षण संस्थेच्या स्थापनेमागे कर्जतचे प्रसिद्ध सराफ व्यावसायिक कै. सुरेश काका कुलथे यांचा मोठा हातभार आहे. सन २००९ मध्ये त्यांनी या संस्थेसाठी तब्बल दीड एकर जमीन मोफत दिली होती, ज्यामुळे भाडेतत्त्वावर चालणाऱ्या या संस्थेच्या विकासाला नवीन दिशा मिळाली.

> कै. सुरेश कुलथे यांनी २००९ साली स्वतःची दीड एकर शेत जमीन या शासकीय विद्यालयाला दिली. ग्रामदैवत गोधड महाराज यांच्या नावाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नामकरण केले यामुळे सर्व कर्जतकरांना मनस्वी आनंद झाला आहे. या संस्थेचे नामकरण गोधड महाराजांच्या नावाने व्हावे, यासाठी माझे वडील सचिन कुठे यांनी विधान परिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे यांच्याकडे पाठपुरावा केला होता, त्याला यश आलेले आहे.
>
> **– ओम कुलथे**

शासनाने याठिकाणी भव्य इमारत उभारली असून, आज ती विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरणास्थान बनली आहे. ग्रामदैवताचे नाव या शासकीय संस्थेला मिळावे.

कार्यक्रमात माजी प्राचार्य गजानन चावरे, मोफत जमीन देणारे ओम कुलथे, बाळासाहेब




> कै. सुरेश कुलथे यांनी मोठे दातृत्व दाखवत या शासकीय आयटीआय साठी स्वतःची दीड एकर जमीन दिली. यामुळे ही भव्य वास्तू या ठिकाणी उभे राहिली आणि आज त्याचे नामकरण झाले आहे.
>
> **– बाळासाहेब लोंढे**

लोंढे, बेद्रे, शिंदे, दादा पाटील महाविद्यालयाचे प्राध्यापक, आयटीआयचे एस. एन. कानडे, मुळे एस. बी., वैद्य आर. डी., शेख आर. एम., भूतकार एस. यु., प्राध्यापक व असंख्य विद्यार्थी, नागरिक उपस्थित होते.

# आश्वी खुर्दमध्ये कृषिदूतांचे ग्रामस्थांकडून स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**झरेकाठी :** संगमनेर तालुक्यातील आश्वी खुर्द येथे महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी संलग्न श्रमशक्ती कृषी महाविद्यालय, मालदाड येथील कृषिदूतांचे आगमन झाले आहे. पुढील तीन महिन्यासाठी ते गावात वास्तव्यास राहून शेतकऱ्यांना विविध कृषी विषयक मार्गदर्शन करणार आहेत. या कृषिदूतांचे आश्वी खुर्द येथे ग्रामपंचायत व शेतकऱ्यांच्या वतीने स्वागत करण्यात आले.

या गटाचे मार्गदर्शक कॉलेजचे प्राचार्य डॉ. अरविंद हारदे कार्यक्रम अधिकारी, प्रा. बी. डी. तायडे असून या गटांमध्ये कृषिदूत अभिनव पळसकर, पंकज पाटील, गणेश मुसमाडे, अविनाश महाले, अथर्व गाडे, प्रशांत धिंदळे,



निशांत फुलारी हे विद्यार्थी आहेत. हे कृषिदुत शेतकऱ्याना नव्या तंत्र माहिती, सुधारित शेती पद्धती, पिकाचे नियोजन, खत व्यवस्थापन, जैविक शेती सिंचन पद्धती आणि विविध सरकारी योजनेचा लाभमिळवून देण्याचे कार्य करण्यात येणार आहे.

या कृषिदूतांचे आश्वी खुर्द येथे ग्रामपंचायत व शेतकऱ्यांच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी गावचे सरपंच अलका गायकवाड, उपसरपंच प्रताप भवर, विकास गायकवाड, ग्राम सेवक प्रवीण इल्हे, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मंडळी उपस्थित होते. या उपक्रमामुळे गावातील शेतीत नक्कीच सकारात्मक बदल घडतील, असा विश्वास शेतकऱ्यांनी व्यक्त केला.

# अमिष दाखवून फसवणूक करणारा गजाआड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा पोलीस स्टेशनमध्ये १९ डिसेंबर २०२४ रोजी संजय बेल्हेकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अमोल काळे व किशोर नवले यांच्यावर फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

आरोपी यांनी फिर्यादी यांना एक लाख रुपये गुंतवा व



महिन्याला दहा हजार रुपये परतावा मिळवा, असे आमिष दाखवून आरोपी यांनी फिर्यादी यांच्याकडून वेळोवेळी ऑफलाइन व ऑनलाईन मोठी रक्कम घेतली होती.

१९ डिसेंबर २०२४ ते ५ जून २०२५ पर्यंत मूळ आरोपी अमोल काळे पोलिसांना गुंगारा देऊन नजरेआड लपत होता. मात्र दि. ५ जून २०२४ रोजी श्रीगोंदा पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार आरोपी वाढदिवसानिमित्त पुण्यात कोंढवा परिसरात असल्याची माहिती मिळाल्यावरून पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांनी कर्मचाऱ्यांसह तपासी अधिकारी पीएसआय गणेश आहिरे यांना सूचना देऊन सापळा रचून आरोपी अमोल काळे यांना रात्री उशिरा पकडुन त्याला गजाआड केले.

> आरोपींकडून मोठ्या प्रमाणावर रक्कमेचा अपहार झाला आहे. श्रीगोंदा तालुक्यासह आसपासच्या नागरिकांनी ज्यांची कुणाची फसवणूक झाली असेल त्यांनी पुढे येऊन श्रीगोंदा पोलीस स्टेशनमध्ये तक्रार देऊन जे काही कागदोपत्री पुरावे आहेत. ते द्यावीत जेणेकरून पुढील तपासासाठी त्यांचा उपयोग होईल.
>
> **– पीआय किरण शिंदे, पोलिस निरीक्षक**

# 'श्री स्वामी समर्थ'च्या भक्तिरसात न्हालेले पावनस्थळ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** रांधे येथील श्री स्वामी समर्थ देवस्थान येथे हजारो भाविकांची दर्शनासाठी उत्स्फूर्त गर्दी उसळते. श्रद्धा, भक्ती आणि सेवाभाव यांची त्रिवेणी येथे अनुभवायला मिळते. स्वामी समर्थ महाराजांच्या कृपाछत्राखाली हे मंदिर दिनानुदिन नवनवीन उंची गाठत आहे. हे देवस्थान अक्षरशः भक्तिरसात न्हालेलं पावनस्थळ आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

मंदिर व्यवस्थापन समितीचे कार्य अत्यंत कौतुकास्पद आहे. समितीचे अध्यक्ष



सुभाषराव भोसले यांनी आपल्या कार्यतत्परतेने आणि निष्ठेने संपूर्ण परिसरात शिस्तमय आणि भक्तिपूर्ण वातावरण निर्माण करण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. त्यांचं नेतृत्व मंदिर विकासाच्या प्रत्येक पैलूत स्पष्टपणे दिसून येते.

उपाध्यक्ष मच्छिंद्र टावरे हे प्रत्येक गुरुवारी भक्तांसमोर भावपूर्ण आणि सुरेल पद्धतीने श्री स्वामी समर्थांचा जप वदन करून घेतात, जेणेकरून संपूर्ण वातावरण अध्यात्मिक ऊर्जेने

> **... इथं प्रत्येक गुरुवारी होतो प्रकट**
>
> सेवेकऱ्यांच्या तळमळीने, भक्तांच्या नित्य भेटींनी आणि स्वामींच्या कृपापात्र होण्याच्या ओढीने, हे मंदिर अल्पावधीतच लाखो लोकांच्या श्रद्धेचे केंद्र बनले आहे. रांधे गावाचं नाव आता श्रद्धेच्या नकाशावर उठून दिसत आहे आणि हे शक्य झालंय केवळ त्या भक्तीभावामुळे, जो इथं प्रत्येक गुरुवारी प्रकट होतो.

भरून जाते.

भक्तांसाठी दर गुरुवारी भंडाऱ्याचे आयोजन केले जाते. येणाऱ्या भक्तांची संख्या पूर्वानुमान करता येत नसली, तरी कोणत्याही भक्ताला उपाशी पोटी परत जावं लागणार नाही, याची कटाक्षाने काळजी घेतली जाते. सेवेकरी सांगतात की, स्वामी परीक्षा घेतात, पण सेवा पाहून कृपाही करतात आणि याच भावनेने प्रत्येक कार्य घडवले जाते. स्वामी समर्थांच्या अदृश्य रूपाचा अनुभव घेतल्यासारखं वाटते. येथे येणाऱ्या प्रत्येक भक्ताच्या मनात स्वामींचा विश्वास खोलवर रुजलेला असतो. हे मंदिर म्हणजे भक्तीचा आणि श्रद्धेचा आरसा आहे.

# यशोदाच्या साहित्याप्रभा पुरस्काराचे वितरण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव शहर :** कोपरगाव तालुक्यातील जेऊर कुंभारी येथील यशोदा प्रतिष्ठाण यांच्या वतीने कै. सयाजी आवडाजी गायकवाड यांच्या स्मृती प्रित्यर्थ साहित्य व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तीसाठी राज्यस्तरीय साहित्याप्रभा पुरस्कार दिला जातो.

तसेच कै. यशोदा सयाजी गायकवाड यांच्या स्मृती प्रित्यर्थ संघर्षमय जीवन जगत असतांना आपला संसाराचा गाडा सुरळीत चालवून आपल्या मुलांवरील संस्कार व त्याच बरोबर त्यांचे शिक्षण व त्यांच्या आयुष्याच्या संघर्षात व जडणघडणीत मोलाची भूमिका पार पाडणाऱ्या मातेसाठी राज्यस्तरीय आदर्श माता पुरस्कार देवून सन्मानित केले जाते.

सदरचा उपक्रम राबविण्याचे यशोदा प्रतिष्ठाणचे हे पाचवे वर्ष असून या वर्षीचा राज्यस्तरीय आदर्शमाता पुरस्कार आशाबाई भिकन आहिरे तर राज्यस्तरीय साहित्याप्रभा पुरस्कार बाबासाहेब कोंडीराम पवार यांना जाहीर करण्यात आला होता. त्यानुसार नुकताच साहित्यिक कैलास दौंड, मा. प्राचार्या माहेश्वरी गावित,



चित्रपट निर्माते व दिग्दर्शक संदीप राक्षे, व्याख्याते व साहित्यिक सुभाष सोनवणे, संजय वाघ, प्रशांत वाघ, अंजनाबाई वाघ, निवृत्त पोलीस अधिकारी रीताताई जाधव आदी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

यावेळी राम गायकवाड, शाम गायकवाड, प्रा. रावसाहेब गायकवाड, आदिराज गायकवाड, अरविंद शेलार, डॉ. प्राजक्ता गायकवाड, डॉ. मंगल सांगळे, कवीयत्री स्वाती ठुबे, माजी नगराध्यक्षा ऐश्वर्या सातभाई, प्रभाकर सूर्यवंशी, हेमराज भवर आदी उपस्थितीत होते.

# 'पीपल्स'चे सचिवासह पाच संचालक संस्थे बाहेर?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** जामखेडच्या वादग्रस्त पीपल्स एज्युकेशन सोसायटीची तब्बल ७० वर्षात पहिल्यांदा निवडणूक पार पडली परंतु ही निवडणूक अद्यापही अनेक बाबतीत वादग्रस्त ठरत आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशनंतर दोन पद्धतीने मतदान घेण्यात आले. १९९५ च्या ६३ सभासदा पैकी फक्त १७ सभासद जिवंत आहे. त्यांना उप आयुक्त धर्मदाय यांनी मताचा अधिकार दिला होता. त्यांचे मतदान स्वतंत्रपणे घेण्यात आली.

इतर मतदारांच्या वतीने उच्च न्यायालय खंडपीठ छ. संभाजीनगर येथे उल्हास पवार यांनी याचिका दाखल करून मतदान अधिकार मागणी केली होती. मा. उच्च न्यायालयाने सर्व मतदारांचा मतदान अधिकार मान्य केला. परंतु निवडणूक प्रक्रिया सुरू झाल्यामुळे थांबवता येत नसल्याचे स्पष्ट करत इतर एकूण १७६ सभासदांना मतदानाचा अधिकार दिला. परंतु निवडणूक प्रक्रिया पुढे गेल्यामुळे १९९५ पर्यंतच्या सभासदाला निवडणूक लढण्यास परवानगी दिली त्यांची संख्या ६३ जरी असली तरी त्यात फक्त १७ सभासद जिवंत आहेत. हे न्यायालयात स्पष्ट करता आले नाही. त्यामुळे निवडणुकीत दोन गटा चे मिळून २२ सुधा सभासद नव्हते त्यामुळे ही निवडणूक फक्त १७ लोकांमध्ये झाली.

> आम्ही सर्व सभासदांना मतदान अधिकार व निवडणूक लढण्याचा अधिकार मिळावा म्हणून प्रयत्न केले. परंतु काही लोकांनी स्वर्थासाठी स्वतःच्या कुटुंबातील लोकांना सुद्धा मतदान अधिकार मिळू नये, म्हणून प्रयत्न केले. मात्र आम्ही उच्च न्यायालयात जाऊन आमच्यासह त्यांच्या कुटुंबातील सभासदाला मत अधिकार मिळून दिला. पण त्यांनी आपल्या घरातील लोकांना मत अधिकार मिळून सुद्धा मतदान करू दिले नाही.
>
> **–दिलीप बाफना, प्रवीण देशपांडे**

# शेतकऱ्यांनी जमिनीच्या आरोग्याची काळजी घ्यावी

## शांताराम सोनवणे; विकसित कृषी संकल्प अभियाना अंतर्गत खत व्यवस्थापनावर जागृती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** जमिनीचे आरोग्य समजून घेत असतांना माती परीक्षणानुसार खतांच्या वापरावर भर देण्याची गरज आहे. तज्ञांचे मार्गदर्शन घेऊन येणाऱ्या काळात खतांचा वापर करतांना जमिनीची सुपिकता टिकविण्यासाठी सेंद्रीय शेती, जिवाणू खते, स्लरी तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, असे प्रतिपादन कृषि विज्ञान केंद्राचे मृद विज्ञान विभागाचे प्रमुख शांताराम सोनवणे यांनी केले.

शेतकऱ्यांमध्ये आधुनिक तंत्रज्ञान आणि नवीन बियाणांच्या जाती बद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी २९ मे ते १२ जून २५ या कालावधीत विकसित कृषी संकल्प अभियान ही देशव्यापी मोहीम सुरू झाली.

संस्थेचे अध्यक्ष तथा

> **प्रात्याक्षिकांतून शेतकऱ्यांना माहिती**
>
> पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखिल सेंद्रिय शेतीला चालना देण्याठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले असल्याते सांगून विविध सेंद्रिय खते, गांडूळ खत, शेण गोमुत्र स्लरी आणि जैविक खते यांचा वापर याविषयी प्रात्याक्षिकांतून माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली.

> **तज्ञांनी दिला शेतकऱ्यांना संदेश**
>
> केंद्र सरकार आणि राज्य सरकार हे नैसर्गिक शेती,सेंद्रिय शेतीला चालना देत आहे येणाऱ्या काळात देशाला विषमुक्त शेतीची गरज आहे. याव्दारे कृषि क्षेत्रात युवकांना रोजगार देखिल उपलब्ध होणार असल्याने शेतकऱ्यांनी जमिनीचे महत्व समजून घ्यावे, हाच संदेश तज्ञांनी दिला.



पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालीनीताई विखे पाटील आणि संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रियाताई ढोकणे, संचालक डॉ. उत्तमराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विज्ञान केंद्र बाभळेश्वर, कृषी विभाग, महाराष्ट्र शासन, केंद्र, आणि राज्य पातळीवरील संस्था, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी आणि आत्मा अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर जिल्ह्यातील राहाता, श्रीरामपूर, राहुरी, कोपरगाव, अकोले, संगमनेर आणि पारनेर या तालुक्यांमध्ये ही मोहीम सुरु आहे.

या अंतर्गत आयोजित जनजागृती कार्यक्रमात सोनवणे बोलत होते. यावेळी केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख, एन. आय. ए. एस. एमचे डॉ. विजय काकडे, डॉ. गोरक्ष वाकचौरे, के. व्ही. के. चे शास्त्रज्ञ शांताराम सोनवणे, डॉ. प्रियंका खर्डे, डॉ. विलास घुले, सज्जला लांडगे, डॉ. विठ्ठल विखे, कैलास लोंढे आणि बचत गटातील महिला, शेतकरी उपस्थित होते.

सोनवणे म्हणाले, जमीन ही शेतकऱ्यांचा आत्मा आहे. आज जमीन व्यवस्थापनाकडे लक्ष न दिल्याने उत्पादन खर्चात मोठी अशी वाढ झाल्या यामुळे उत्पादन देखील घटले.

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी कृषी क्षेत्राला नवे तंत्रज्ञान देण्याचं काम आपल्या राहाता तालुक्यांमध्ये केले आहे. कृषी मंत्रिपदाच्या कालावधीमध्ये माती परीक्षणांवर त्यांनी विशेष लक्ष दिल्याने आज आपल्या भागामध्ये जमिनीची सुपीकता काही अंशी टिकून आहे.

# जिल्ह्यातील २४ कृषी सेवा केंद्रांचे परवाने रद्द

## खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर केंद्रांची तपासणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : खरीप हंगामच्या पार्श्वभुमीवर कृषी विभागाने जिल्हाभरात कृषी सेवा केंद्रांची जोमाने तपासणी मोहीम राबविण्यास सुरूवात केली आहे. या मोहीमेदरम्यान मोठ्या प्रमाणावर अनियमितता आढळून आल्या आहेत.

नियमबाह्य कामकाज करणाऱ्या केंद्रांवर कारवाई करत राहुरी तालुक्यातील २ आणि नेवासा तालुक्यातील १ असे ३ परवाने निलंबित करण्यात आले आहेत. आतापर्यंत २४ केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द केले असून ३ केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत.



कृषी विभागाच्या तपासणीत विविध त्रुटी उघड झाल्या असून, त्यामध्ये भावफलक व साठाफलक नसणे, विक्री परवाना दुकानदाराने दर्शनी भागात न लावणे, साठा पुस्तके अद्ययावत नसणे, स्रोत परवान्यात नमूद नसणे, ग्राहकांना पावत्या न देणे, विक्री अहवाल दर महिन्याला सादर न करणे, टोल फ्री क्रमांक उपलब्ध नसणे आणि खतांची विक्री पॉस मशिनवरून न करणे अशा गंभीर त्रुटींचा समावेश आहे.

तपासणीनंतर दोषी ठरलेल्या केंद्रांना नोटीस देऊन सुना-वणीही घेण्यात आली. या सुनावणीदरम्यान दोष सिद्ध झाल्यानंतर संबंधितांवर कडक कारवाई करण्यात आली आहे. विक्री परवाने घेतले असतानाही दुकाने बंद ठेवणाऱ्या केंद्रांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले.

> खरीप हंगामात शेतकऱ्यांना योग्य वेळी आणि नियम ानुसार सेवा मिळाव्यात, यासाठी ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. यापुढील काळातही अशाच प्रकारची नियमित तपासणी सुरू राहणार असून, नियमभंग करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जाणार आहे.
>
> **- सुधाकर बोराळे,**
> **जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी**

जिल्ह्यामध्ये राहुरी तालुक्यात ४, अकोले ६, नेव-ासा ५, शेवगाव ३, नगर ३ आणि पाथर्डी ३ अशा एकूण २४ विक्री केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत. कारण अनेक दुकानदार खते विकताना पॉश मशिनचा वापर करत नाहीत. तसेच पक्की बिलेही फाडताना दिसत नाहीत. औषधांच्या बाबतही तसेच केले जात आहे. ही बाब अतिशय गंभीर आहे. कारवाईमुळे दुकानदार धास्तावले आहेत.

# प्रवरेच्या कृषीकन्यांचे साकुरीत आगमन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी**: राहाता तालुक्यातील साकुरी येथे कृषी महाविद्यालय, लोणी येथील कृषीकन्यांचे आगमन झाले आहे. यावेळी ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी या कृषीकन्यांचे स्वागत केले.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा कृषी शास्त्र संस्था अंतर्गत कृषी महाविद्यालय, लोणी येथे हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुष्मिता विखे पाटील, कृषी संचालक डॉ. उत्तमराव कदम, कृषी महाविद्यालय लोणीचे प्राचार्य डॉ.दिलीप म हाले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कार्यक्रम सम न्वयक डॉ. रमेश जाधव, कार्यक्रम अधिकारी डॉ. विक्रम अनाप आणि प्रा. अक्षया वाळुंज यांच्या सूचनेनुसार कृषीकन्या जानवी पटेल, कार्तिकी जोशी, मनीषा झाल्टे, हर्षदा कातोरे, भक्ती कोते, वैभवी वसावे, वैष्णवी डावरे साकुरी येथील शेतकऱ्यांचे अनुभव जाणून घेत त्यांना मार्गदर्शन करणार आहेत.




याप्रसंगी ग्रामपंचायत साकुरी च्या सरपंच मेघना दंडवते, उपसरपंच सिंधु देवकर, ग्रामविकास अधिकारी बाबासाहेब मातंग, ग्रामस्थ व शेतकरी यांनी स्वागत केले.

कृषी शिक्षणाच्या माध्यमातून कृषीकन्या येथील शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती, बीजप्रक्रिया, गांडूळखत उत्पादन, चारा पिके, दुग्ध व्यवसाय, बायोगॅस इ. संदर्भात माहिती देणार आहे.

# राष्ट्रवादी कॉँग्रेसचा पुणे येथे वर्धापनदिन

## माजी आ. लहू कानडे उपस्थित राहणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : राष्ट्रवादी कॉँग्रेसचे राष्ट्रीय नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री मा.ना. अजितदादा पवार व मा.प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरेसाहेब यांच्या आदेशान्वये दिनांक १० जुन, २०२५ रोजी पुणे येथे होणाऱ्या राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वर्धापन दिनानिमित्त होणाऱ्या कार्यक्रम ाच्या नियोजन बैठकीत श्रीराम पूर विधानसभा मतदार संघातून राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कार्यकर्ते हजारोच्या संख्येने जाणार असल्याचे माजी आ.लहू कानडे यांनी सांगितले.

या बैठकीत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतांना कानडे म्हणाले की, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हा उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांचे नेतृत्त्वाखाली सर्व सम ाजाला बरोबर घेवून जाणारा व शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचाराचा पक्ष असल्याने श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघामधे या पक्षात येण्यासाठी अनेक कार्यकर्ते इच्छुक आहेत.



तसेच आगामी नगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषदेच्या निवडणुका हया कार्यकर्त्यांच्या असुन त्यासाठी पक्ष सभासद नोंदणी व संघटना बांधणी करावी. कार्यकर्त्यांना विविध पदावर निश्चितच संधी दिली जाईल. राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने सर्वसामान्य जनतेच्या अडचणी व समस्या सोडविणेसाठी व सर्व शासकीय कार्यालयावरील कामकाजावर नियंत्रण ठेवणेसाठी कार्यकर्त्यांच्या समित्या नेमण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या बैठकीसाठी प्रदेश सरचिटणीस अरुण पाटील नाईक, माजी सभापती, वेणुनाथ कोतकर, विष्णुपंत खंडागळे, कार्लस साठे, नानासाहेब रेवाळे, बाबासाहेब कोळसे यांसह आदी उपस्थित होते.

# पिंपरी निर्मळ येथे वादळी पावसात डाळिंब बागांचे नुकसान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता** : राहाता तालुक्यातील पिंपरी निर्मळ येथे शुक्रवारी (दि.६) सायंकाळी झालेल्या वादळा पावसात प्रवीण घोरपडे यांच्या दोन एकर डाळिंब बागेचे प्रंचड नुकसान झाले आहे. धरलेली झाडे मुळासकट उन्म ळून पडली आहे.

वादळी पावसाने पिंपरी निर्मळमध्ये अक्षरशः दाणादाण उडवली. प्रचंड वादळामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. धरलेल्या डाळिंब बागा वादळात उन्मळून पडल्या आहेत. लाखो रुपयांचा खर्च करून हातातोंडाशी आलेला घास यामुळे हिरावून गेला आहे. बाह्यवळण रस्त्याला असलेल्या प्रवीण बाळासाहेब



घोरपडे यांच्या धरलेल्या डाळिंब फळबागेचे यात प्रचंड नुकसान झाले आहे. जोराच्या वाऱ्यामुळे दोन एकरातील बागेची झाडे मोठ्या प्रमाणात उन्मळून पडली आहे.

त्यामुळे त्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. कृषी विभाग व महसूल विभागाने याचे पंचनामे करावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या चार जनावरांची केली सुटका

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : शहरातील वॉर्ड नंबर दोन मधील कुरेशी म ोहल्ला येथे कत्तल करण्याच्या उद्देशाने ठेवलेल्या चार गोवंशीय जनावरांची शहर पोलिसांनी सुटका केली. या ठिकाणाहून एक लाख तीस हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

पोलीस निरीक्षक नितीन देशमुख हे पेट्रोलिंग करत असताना त्यांना गुप्त बातमीदारा मार्फत शहरातील वार्ड नं. २ परिसरातील कुरेशी मोहल्ला येथील एका पडक्या घराम ध्ये काही गोवंश जनावरांना कत्तल करण्याच्या उद्देशाने बांधून ठेवलेले आहे, अशी गुप्त बातमी मिळाली. त्यावर



त्यांनी सदर ठिकाणी जावून कारवाई करा असा तोंडी आदेश दिल्याने सपोनि गणेश जाधव, उपनिरीक्षक राकेश निकम, पोलीसनाईक श्री. अडागळे, पोलीस कॉन्स्टेबल आजिनाथ आंधळे, श्री. पडोळे, श्री. खरात,

श्री. चौधरी, धनंजय वाघम ारे आदींनी कुरेशी मोहल्ला, वार्ड नं. २ येथे जाऊन एका पडक्या घरामध्ये चारा पाण्या वाचून बांधलेली लहाण मोठी गोवंशीय जातीच्या जनावरांची सुटका केली. पोलिसांनी सदर ठिकाणाहून ९० हजार रुपये किमतीची दोन पांढऱ्या रंगाची गोवंशीय मोठी जनावरे, २० हजार रुपयाचे एक छोटे जनावर, २० हजार रुपये किमतीचे काळ्या पांढऱ्या रंगाचे छोटे

जनावर असा एकूण एक लाख तीस हजार रुपयांचा मुद्देम ाल हस्तगत केला आहे.

याप्रकरणी अज्ञात इसमा विरुध्द महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ चे सुधारीत कायदा २०१५ चे कलम ५.५ (अ), ५ (ब). ९ (अ) सह प्राण्यांना क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधि. १९६० चे कलम ११ (च) (ज) प्रमाणे पुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जीवनात यशस्वीतेसाठी आत्मविश्वास महत्त्वाचा

## प्रा. दवंगे : वारीत दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन शिबिर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : दहावी-बारावी उत्तीर्ण झाल्यानंतरचा जीवनातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. यामध्ये विद्यार्थ्यांनी घेतलेल्या परिश्रमातून आणि मिळवलेल्या गुणातून विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक प्रवासाचे गणित अवलंबून असते. मात्र अशाही परिस्थितीमध्ये कमी गुण मिळाले तरी विद्यार्थ्यांनी खचून न जाता स्वतःच्या आत्मविश्वासाच्या बळावर शिक्षणातील कोणताही पर्याय निवडून परिश्रम घेत आपल्या जीवनात यशस्वी होता येते. मात्र; हे सर्व करताना संस्कारही तितकेच महत्त्वाचे असल्याचा मौलिक सल्ला करियर मार्गदर्शक प्रा. साहेबराव दवंगे



यांनी दिला.

कोपरगाव तालुक्यातील वारी येथील राहुल दादा मधुकरराव टेके पाटील चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने वारी पंचक्रोशीतील दहावी-बारावीतील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी 'दहावी-बारावी नंतर काय?' या अनुषंगाने करियर मार्गदर्शन शिबिर तसेच विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख मार्गदर्शन म्हणून प्रा. साहेबराव दवंगे बोलत होते. प्रमुख अतिथी म्हणून कोपरगाव पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब साबळे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वारी गावचे माजी उपसरपंच सामाजिक कार्यकर्ते रामदास सोनवणे होते. कार्यक्रमाची राहुल दादा टेके यांच्यासह महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन व दीप प्रज्वलन करून सुरुवात करण्यात आली.

अध्यक्षीय भाषणात राम दासजी सोनवणे म्हणाले, शिक्षण हा जीवनातील अत्यंत महत्त्व-ाचा घटक आहे. त्यातून देशाची योग्य संस्कारक्षम व ध्येयवादी विचारांची पिढी निर्माण होत असते. त्यामुळे अशा प्रकारचे शिबिर ग्रामीण भागात सुरू झाले ही निश्चितच कौतुकाची बाब आहे.

पुढील काळात याही भागातून मोठे अधिकारी निर्माण होतील यात शंका नाही. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात टेके पाटील ट्रस्टचे अध्यक्ष पत्रकार रोहित टेके यांनी या शिबिराविषयी महत्त्व पटवून देत ट्रस्टच्या कार्याचा आढावा घेतला.

# साडेचार टन मांगूर घेऊन जाणारा ट्रक पकडला

## राहाता पोलिसांची कारवाई; चौघांवर गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता** : मानवी शरीरास व पर्यावरणास अपायकारक असलेला व देशात प्रतिबंधित असलेले मांगूर जातीचे साडेचार टन वजनाचे मासे ताब्यात घेऊन राहाता पोलिसांनी नगरपालिका कर्मचाऱ्यांच्या मदतीने खड्डे घेऊन विल्हेवाट लावली आहे. भिगवण येथून मालवाहू ट्रकमधून हे मासे मध्य प्रदेशात घेऊन चालले होते. पोलिसांनी केलेल्या नाकाबंदीत हा मालट्रक ताब्यात घेतला होता. याप्रकरणी ट्रकचालकासह इतर आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

शिर्डीचे उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर अवैध गोवंश वाहतूक कारवाईच्या अनुषंगाने राहात्याचे पोलीस निरीक्षक नितीन चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक योगेश शिंदे, किरण सांळुखे, सहाय्यक फौजदार प्रभाकर शिरसाठ, पोहेकॉ. विशाल पंडोरे, पोकॉ. अनिल गवांदे, पोलीस नाईक विनोद गंभीरे व चापोहेकॉ. शेषराव अनारसे हे शुक्रवारी (दि.६) चितळी चौकात नाकाबंदी करीत असताना ट्रक (क्र. आरजे. २५, जीए. ६९५८) अहिल्यानगरकडून शिर्डी दिशेने संशयीतरित्या जाताना दिसून आल्याने त्यास चितळी चौक येथे थांबवून खात्री केली



असता त्यात देशात प्रतिबंधित असलेले मांगूर जातीतील मासे मिळून आल्याने ट्रक चालकास त्याबाबत विचारणा केली असता तो उडवाउडवीचे उत्तरे देवू लागला. त्यानंतर प्रभारी सहाय्यक मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी प्रतीक्षा पाटेकर यांना बोलावून घेत खात्री केली असता सदर ट्रकमध्ये सुमारे ४ चार लाख ६० हजार रुपये किंमतीचे सुमारे ४ हजार ६०० किलो वजनाचे म ांगूर मासे मिळून आले. पंचनामा करुन पालिका कर्मचाऱ्यांच्या मदतीने पोलिसांनी माशांची विल्हेवाट लावली.

# कर्जतमध्ये 'एक पेड माँ के नाम' अनोखा उपक्रम

## नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून वृक्षारोपण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आईच्या नावाने कर्जतमध्ये झाडे लावून, एक पेड माँ के नाम हा उपक्रम राबविण्यात आला.

पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारला ११ वर्षे पूर्ण झाली असून मोदी सरकारचा ११ यशस्वी प्रवास व विकासाभिमुख कार्य अहिल्यानगर जिल्ह्या-तील सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहचण्यासाठी संकल्प ते सिद्धीपर्यंत या सूत्रावर आधारित कार्यक्रमा अंतर्गत "एक पेड माँ के नाम या .नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतुन वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

सर्व समाजिक संघटना यांच्या पुढाकारामधून कर्जत शहरांमध्ये सव्वा लाखाच्या आसपास वृक्षारोपण करून कर्जत शहर स्वच्छ व हरित करणाऱ्या सर्व सामाजिक संघटना व प्रबोधनकार क्रीडा व सांस्कृतिक ग्रामीण सेवाभावी प्रतिष्ठान कर्जत यांच्या संयुक्त विध्यमाने भाजपा चे जिल्हा सरचिटणीस सचिन पोटर यांनी आज वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी ,केंद्रीय गृहमंत्री अमित शहा , मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , विधान परिषद सभापती राम शिंदे, केंद्रीय पर्यावरणमंत्री भुपेंद्र यादव, भाजपा प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे , भाजपा कार्याध्यक्ष



आ.रवींद्र चव्हाण , पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा. पर्यावरण मंत्री .पंकजा मुंढे ,आ.शिवाजीराव कर्डीले ,आ.मोनिकाताई राजळे ,आ.विक्रमसिंह पाचपुते या सर्व पंतप्रधान,मुख्यमंत्री ते जिल्ह्यातील आमदारांच्या मातोश्रींच्या नावे " एक पेड माँ के नाम हा अभिनव वृक्षारोपण राबविला.

यावेळी नगराध्यक्ष रोहिणी घुले ,उपनगराध्यक्ष संतोष म्हेत्रे , अनिल गदादे , विनोद दळवी , सुनील यादव सुनील शेलार , रवींद्र सुपेकर , प्रशांत शिंदे सह भाजपा चे पदाधिकारी व सर्व सामाजिक संघटनेचे शिलेदार मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

# व्यंकटेश फाऊंडेशनकडून एकत्रित वृक्षारोपण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : आपलं पर्यावरण, आपलं भविष्य याच विचाराने प्रेरित होऊन व्यंकटेश मल्टीस्टेट व व्यंकटेश फाऊंडेशनच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त एकत्रित वृक्षारोपण मोहीम राबवण्यात आली.

या मोहिमेद्वारे एकाच दिवशी तब्बल ६०० पेक्षा जास्त झाडांची लागवड करून पर्यावरण रक्षणाचा ठोस संदेश देण्यात आला. व्यंकटेश मल्टीस्टेटच्या सर्व शाखांमध्ये पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण करण्याचं आधीच नियोजन करण्यात आले होते. म्हणून ही मोहीम यशस्वीरित्या पार पडल्याची माहिती संस्थेच्या वतीने देण्यात आली.

विशेष करून सर्व शाखांच्या परिसरातील शाळा, दवाखाने अशा ठिकाणी स्थानिक काही प्रमुख व्यक्तींच्या मदतीने विविध प्रजातींच्या रोपांची लागवड करण्यात आली. त्यामुळे त्यांना जगवण्याची वैयक्तिक जबाबदारी कर्मचारी वर्गासह स्थानिकांनीही घेतली.

यावेळी स्थानिक प्रतिष्ठित नागरिकांसह शाळकरी मुले, स्वयंसेवक, अधिकारी आणि युवा कार्यकर्त्यांनी एकत्र येत पर्यावरण दिन संस्मरणीय करण्यासाठी मदत केली. व्यंकटेश मल्टीस्टेट व फाऊंडेशन या संस्था समाजाच्या प्रगतीसाठी नेहमी तत्पर असतात.

पर्यावरण दिनही त्याचाच भाग असून तेच आपलं भविष्य आहे. त्यामुळे वाढतं तापमान, बदलतं हवामान आणि प्रदूषण यांना आटोक्यात आणण्यासाठी झाडं लावणं ही आजची गरज असल्याचा ठाम संदेश संस्थेने या वेळी दिला. हा कार्यक्रम व्यवस्थित पार पाडण्यासाठी संस्थेच्या प्रत्येक अधिकारी व कर्मचारी वर्गाने मोलाची भूमिका बजावली आहे.

# शेवगावात ईद उत्साहात



**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : इस्लामीक तारखेनुसार आज शनिवार दि ७-६-२०२५ रोजी नगर रोड आयटी आय जवळील नवीन ईदगाह येथे ईदउलअज्हा नमाज अदा करण्यात आली. यावेळी शेवगावचे मौलाना आबेद हाफिज सहाब यांनी प्रवचन करून सर्वांना नमाज व इस्लाम काय आहे.

या बाबत सविस्तर प्रवचन केले. त्यानंतर नमाज अदा करण्यात आली तसेच खुदबा वाचन झाले सर्व भारतीय रहिवासी तसेच पशू पक्षी सर्वांसाठी प्रार्थना करण्यात आली या वेळी पोलिस बंदोबस्त मोठ्या प्रमाणात होता. शहर व तालुक्यातील मोठ्या संख्येने मुस्लिम समाज ईदउलअज्हा नमाज करिता उपस्थित होते.

# प्रवरा अभियांत्रिकीच्या २६ विद्यार्थ्यांना नोकऱ्या

## प्राचार्य डॉ. संजय गुल्हाने यांची माहिती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : आहिल्यानगर जिल्ह्यातील नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालय, प्रवरा रुरल इंजिनिअरिंग कॉलेज, लोणी येथील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करीत अभिम ानास्पद यश संपादन केले आहे. महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरिंग या विभागातील अंतिम वर्षातील २६ विद्यार्थ्यांची कॉंग्रोझंट, रॅनफोर्ड आय टी सोलूशन, क्वालिटी किओस्क टेक्नॉलॉजीज, मुंबई



नामांकित निबे एरोनॉटिकल अँड डिफेन्स, एपिटोम कॉम्पोनंट, सिरमा एस जी एस टेक्नॉलॉजी, लोजीपुल इन्फोटेक या सारख्या नामवंत सॉफ्टवेअर कंपनीमध्ये निवड झाली असून ग्रामीण विद्यार्थ्यांना नोकरीची संधी प्राप्त झाली आहे. अशी माहीती प्राचार्य डॉ. संजय गुल्हाने यांनी दिली.

इलेक्ट्रॉनिक्स आणि कॉम्प्युटर अभियांत्रिकी ही शाखा तंत्रज्ञान क्षेत्रातील एक महत्त्व-ाची शाखा असून, हार्डवेअर आणि सॉफ्टवेअरचा परिपूर्ण संगम आहे. आजच्या काळात संगणक प्रणालीतील सुधारणा आणि नव्या तंत्रज्ञानाच्या विकासासाठी इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरिंग शाखेतील अभियंत्यांची मोठी मागणी आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाअंतर्गत प्रवरा अभियांत्रिकी महाविद्यालयाम ध्ये ही शाखा अत्याधुनिक प्रयोगशाळा, अनुभवी प्राध्यापक तसेच उद्योगसमोरील तांत्रिक आव्हानांवर काम करण्याची संधी उपलब्ध करून देते. या शाखेतील विद्यार्थ्यांना एआय, मशीन लर्निंग, डेटा सायन्स, एम्बेडेड सिस्टम्स यासारख्या नव्या तंत्रज्ञानावर काम करण्याची संधी मिळते.

> क्वालिटी किओस्क टेक्नॉलॉजीज ही आयटी आणि सॉफ्टवेअर टेस्टिंग क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी असून, विविध आंतरराष्ट्रीय क्लायंटसाठी गुणवत्ता तपासणी आणि ऑटोमेशन सेवांसाठी प्रसिद्ध आहे. कंपनीने प्रवरा अभियांत्रिकी महाविद्यालयात कॅम्पस ड्राईव्ह घेतला, ज्यामध्ये विविध टप्प्यांतून निवड प्रक्रिया पार पडली. ऑनलाइन अप्टिट्यूड, टेक्निकल इंटरव्ह्यू प्रोग्रॅमिंग कौशल्ये व लॉजिकल सोल्युशन्स तपासणी, एचआर इंटरव्ह्यू व्यक्तिमत्व व संवाद कौशल्यांची चाचणी या प्रक्रियेतून यशस्वी विद्यार्थ्यांनी ऑफर लेटर मिळवले आहे.



# भक्तिमार्ग

उन्हाळ्याचं अखेरचं पर्व सुरू होतं ना होतं तोच आपल्याला पावसाचे वेध लागतात. पांढऱ्याधोट ढगांच्या कडा काळसर होऊ लागताच मनाचे कोपरे उजळू लागतात. एखाद्या-दुसऱ्या वळिवाने काहिली शमतेच त्याचबरोबर उष्णावलेल्या क्लांत तनातही ओलावा पाझरू लागतो. हा पाझर केवळ पावसाचाच नसतो तर त्यापाठोपाठ येणाऱ्या समृद्धी आणि निसर्गभक्तीचा असतो. करू या अशाच एका संपन्न हिरवाईची प्रतीक्षा...



## प्रतिक्षा संपन्न हिरवाईची

पावसाळ्यातील निसर्ग वेडावून टाकणारा... निसर्गाच्या नव्हे तर माणसामाणसाच्या कुडीत पंचप्राण फुंकणारा... पावसानंतर सर्वदूर पसरणारी ओल सर्जनाचं दान देतेच त्याचबरोबर मलूल झालेल्या जीवनेच्छेनालाही नवे धुमारे फुटू लागतात. चैतन्याचं नवं पर्व सुरू होतं ते याच पावसामुळे. आता उन्हाळ्याचं अखेरचं चरण सुरू आहे. लवकरच वणवे शमवणाऱ्या सरी बरसतील आणि सर्वदूर तृप्तीचे ओहोळ बागडू लागतील. आता सर्व प्राणीमात्रांना या तृप्तीची प्रतीक्षा आहे. पावसाळ्यात निसर्गाचं दिसणारं मनोहारी रूप निसर्गपूजकांच्या, निसर्गभक्तांच्या डोळ्यासमोर तरळू लागलं आहे. बळीराजा काळ्या आईच्या दिमतीस सज्ज होत आहे. सध्याचे वळीव पावसाच्या आगमनाची सुवार्ता घेऊन येत आहेत. तेव्हा आणखी थोडी प्रतीक्षा सहन करू या आणि सज्जता करू या एका संपन्न ऋतूपर्वाच्या आरंभाची...

निसर्ग हाच मोठा चमत्कार आहे. आपण यंत्र-तंत्राचा अंदाज घेऊन पावसाचा अंदाज वर्तवतो, पण केवळ आपल्यातच ही क्षमता आहे असं नाही तर वनस्पतींमध्येही ही निसर्गदत्त क्षमता बघायला मिळते. पावसाची चाहुल सर्वात अधिक वनस्पती आणि काही काही पशुपक्ष्यांना लागते हे आता सिद्ध झालं आहे. त्यामुळेच पावसाचा अंदाज वर्तवणाऱ्या अशा वनस्पतींचं जतन करणं आवश्यक आहे. पशू, पक्षी, वनस्पतींची वाढ, बहर यावरच पाऊस लवकर येणार की लांबणार हे सिद्ध होतं. हे संकेत ऋतूचक्राशी निगडीत असतात. पर्जन्य जवळ आल्याचा संकेत प्रथम पळस, कडूलिंबाकडून मिळतो. पावसाळा सुरू होण्याअगोदर करवंदाचा हंगाम जवळपास संपत आलेला असतो. जांभळाचा हंगाम ऐन मध्यावर असतो तर आमरसाची चंगळ असते.

पावसाळा जवळ आला की, पाकोळ्या निवाऱ्यासाठी सुरक्षित जागा शोधण्यात व्यस्त होतात. सुगरण नवीन खोप्यांच्या विणकामात मग्न असते. मुंग्या जमिनीत उबवणीस ठेवलेली अंडी झाडांच्या खोबणीत किंवा घराच्या माळावर अथवा अडगळीच्या सुरक्षित जागी ठेवण्यासाठी अहोरात्र धावपळ करत असतात. तेलमुंग्या, शिकारी मुंगळे बिळात दाणागोटा, रसद साठवताना आढळतात. पंख फुटून त्या सैरभैर उडताना दिसतात. आकाशात चंद्र, सूर्याकडूनही मान्-सूनपूर्व संकेत मिळतात. ही सारी निसर्गाची बालकं आपल्याला पावसाच्या आगमनाची चाहूल लागल्याच संकेत देतात. हे निसर्गभक्त आपल्याला सूचित करतात. शेतकऱ्यांनी मशागतीसाठी सज्ज व्हावं, असाच जणू काही त्यांचा सल्ला असतो. निसर्गाची किमया किती अगाध आहे तेच यावरून सिद्ध होतं.

भक्ती विशेष

या संकेतांचा अभ्यास करणं आणि त्यानुरूप आपल्या कार्याचं नियोजन करणं ही बळीराजाची खरी निसर्गभक्ती ठरावी. आपल्या कृषीप्रधान भारतात शेतीची एक ठराविक पद्धत अवलंबली जाते. पण त्याची उपयुक्तता आणि बदलाची गरजही समजून घेणं इष्ट ठरेल. पारंपारिक शेतीपद्धतीमुळे दिवसेंदिवस शेतजमिनी नापिक होत चालल्या आहेत. संपूर्ण जगात सुमारे २६० कोटी एकर जमीन नापिक झाली आहे. रासायनिक खतांच्या अमर्याद वापरामुळे जमीनाचा कस नष्ट होऊन ती ओसाड होते. हे टाळण्यासाठी सेंद्रिय शेतीचा पुरस्कार करणं क्रमप्राप्त आहे. पुढील काही काळात सेंद्रिय खतांचा वापर न केल्यास शेतजमिनी नापिक होतील.

सेंद्रिय खतांच्या किमती रासायनिक खतांच्या तुलनेने कमी असतात. या खतांच्या वा-परामुळे पिकांना अन्नद्रव्य मिळतातच पण त्याचबरोबर जिवाणुंच्या वाढीसाठीही ती सहाय्यक ठरतात. या खतांचं कार्य जमिनीत बराच काळ सुरू रहात असल्यामुळे फायदा मिळतो. या खतांच्या वापरामुळे उपयुक्त जिवाणुंची संख्या वाढत असल्यामुळे निसर्गातील नायट्रोजन आणि फॉस्फरस पिकांना योग्य प्रमाणात मिळतो. त्यामुळे हवेतील आर्द्रता शोषून घेऊन जमिनीची पाणी धरण्याची क्षमता वाढते. त्याचा परिणाम म्हणून जमिनीत सकस पिक उगवून येतं. पाण्याचं योग्य नियोजन केल्यास जमिनीची उत्पादनक्षमता आणि पिकांची रोगप्रतिकारक शक्ती वाढते. वाढती गरज लक्षात घेऊन आता अशा प्रकारच्या खतनिर्मितीचे प्रकल्प विविध ठिकाणी उभे रहायला हवेत. तरच आपण काळ्या आईचं जतन आणि संवर्धन करु शकू. हीच खऱ्या अर्थाने तिची आराधना ठरेल. पूजा ठरेल.

## कौतुकास पात्र ठरण्यासाठी



कामाच्या ठिकाणी वरिष्ठांची मर्जी संपादन करणं गरजेचं असतं. करीअरमध्ये यशाचे टप्पे गाठणं असो किंवा बढती मिळवणं असो, वरिष्ठांवर प्रभाव टाकल्याखेरीज काहीही होत नाही. वरिष्ठांची मर्जी कशी संपादन करायची याबाबत चाणक्याने सांगून ठेवलंय. अर्थशास्त्रावरील त्याच्या पुस्तकात अनेक गोष्टी नमूद केल्या आहेत. कॉर्पोरेट जगात वावरताना चाणक्यनीतीतले हे उपदेश तुमच्या कामी येतील.

* कौतुकास पात्र ठरण्यासाठी मेहनत करा. कौतुक करण्यासारखं काम करा.
* योग्य सहकारी निवडा. मूर्खांच्या सहवासात राहू नका. तुम्हाला मार्गदर्शन करणाऱ्या, पुढे जाण्यासाठी मदत करणाऱ्या सहकार्यांची निवड करा.
* भविष्याचा विचार करा. आधीच कामाचं नियोजन करून ठेवा. कामाचं योग्य नियोजन करणारी, दूरदृष्टी असणारी माणसं वरिष्ठांच्या पसंतीस उतरतात.
* स्पष्टवक्ते बना. आर्थिक व्यवहार, ज्ञानार्जन, भोजन आणि व्यवसायात बुजरेपणा दूर सारणारी माणसं आनंदी असतात, असं चाणक्य सांगतो. व्यावसायिक आयुष्यात याचा अवलंब करा.
* कक्षा रूंदावण्याचा प्रयत्न करा. ज्ञानासाठी पुस्तकांवर अवलंबून असणारी तसंच धन इतरांच्या ताब्यात असणारी माणसं गरजेच्या वेळी या दोन्ही गोष्टींचा वापर करू शकत नाहीत. त्यामुळे शिकण्याच्या बाबतीत कुपमंडूक वृत्ती नको. सतत ज्ञान मिळवत रहा.
* शिक्षण सर्वात महत्त्वाचं असल्याचं आणि सुशिक्षित माणसाला सगळ्या ठिकाणी मान मिळत असल्याचं चाणक्य सांगतो. त्यामुळे कामात तरबेज व्हा. सगळी कौशल्यं आत्मसात करा.
* वरिष्ठांचा मान राखा. त्यांच्या मताचा आदर करा. आपलं म्हणणं जरुर मांडा पण वरिष्ठांचा अनादर करू नका.
* कामाच्या ठिकाणचे सहकारी आणि मित्र यांच्यातली लक्ष्मणरेषा ओळखा. काम करताना मैत्रीचा विचार करू नका. व्यावसायिक आणि वैयक्तिक नात्यांमध्ये अंतर ठेवा.
* नवं तंत्रज्ञान शिकून घ्या. बदलत्या जगात स्वत:मध्ये बदल न घडवणारा मनुष्य मूर्ख असतो असं चाणक्य सांगतो. त्यामुळे कामाशी संबंधित ज्ञान वाढवत राहा.
* कामातल्या प्रगतीबाबत दवंडी पिटू नका. यश तुमच्यापुरतं मर्यादित ठेवा. वरिष्ठ नक्कीच कामाचं कौतुक करतील.

चाणक्यनीती

## कसं वागू नये?



आयुष्यात आनंद आणि यश मिळवायचं असेल तर काही गोष्टींकडे लक्ष द्यावं लागतं. काही नियम पाळावे लागतात. आयुष्याच्या संघर्षात माणसाच्या हातून अनेक गोष्टी घडत असतात. त्यापैकी काही योग्य तर काही अयोग्य असतात. अजाणतेपणी हातून काही चुका होतात. याबाबतचा उल्लेख रामचरितमानस या ग्रंथात करण्यात आला आहे. रामचरितमानस मधील ओव्यांमधून याबाबत जाणून घेता येईल.

* रागु, रोषु, इरिषा, मदु, मोहु।
जनि जनि सपनेहू बस इन्ह के बस होहु।।
सकल प्रकार बिकार बिहाई।
मन क्रम बचन करेहु सेवकाई।।

याचा अर्थ राग म्हणजे एखाद्याच्या प्रती असणारा क्रोध, रोष म्हणजे नाराजी, मद म्हणजे अहंकार आणि मोह म्हणजे लालसा या अवगुणांचा अंमल व्यक्तीवर झाला की तिच्या शरीरात अनेक विकारांचा वास राहतो. असा मनुष्य मन, कर्म आणि विचारांनी याच विकारांचा गुलाम बनतो.

* अति तेथे माती असं म्हणतात. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा वाईटच. त्यामुळे प्रेमाचा अतिरेकही वाईटच ठरतो. अतिप्रेमामुळे आपण चांगल्या वाईटाचा निर्णय घेऊ शकत नाही. अतिप्रेमामुळे माणूस अधर्म करायला धजावतो. गुरू द्रोणाचार्य हे याचं उत्तम उदाहरण म्हणता येईल. पुत्र अश्वत्थाम्याच्या अतिप्रेमापोटी अधर्मी असल्याचं माहीत असूनही त्यांनी कौरवांना सहकार्य केलं. त्यामुळे अतिप्रेम किंवा मोह घातकच...

* रोष हादेखील माणसाचा सर्वात मोठा शत्रू आहे. रागाच्या भरात माणूस अमानुष कृत्य करू शकतो. रागीट व्यक्तीला कशाचंही भान रहात नाही. असा माणूस राक्षसासमान वागू लागतो. रागात केलेल्या अनेक कृत्यांची मग लाज वाटू लागते. त्यामुळे रोष नियंत्रणात ठेवायला हवा.

* एखाद्याच्या प्रगतीबाबत ईर्ष्या करणारा माणूस आयुष्यात कधीच यशस्वी होत नाही. समोरच्याला खाली पाडण्यासाठी तो कोणत्याही थराला जाऊ शकतो. अशा माणसांना कोणाचंही चांगलं बघवत नाही. दुर्योधन हे क्रोधामुळे होणाऱ्या विनाशाचं एक उदाहरण आहे. दुर्योधनाच्या मनात पांडवांबाबत ईर्ष्या होती. यामुळे तो पांडवांशी वाईट वागला. त्यांच्याविरोधात कटकारस्थानं केली. पण अंती त्याच्या कुळाचा नाश झाला.

स्व मदत

* अहंकार हा सुद्धा माणसाचा शत्रू आहे. अहंकारी माणूस इतरांचे सल्ले मानत नाही. तो स्वत:ला सर्वश्रेष्ठ समजत असतो. यामुळे माणसाचं बरंच नुकसान होतं. चुका न मानणं, इतरांना मान न देणं अशा कृत्यांमुळे अहंकारी माणूस इतरांच्या नजरेतून उतरतो आणि एकटा पडतो.

* कोणतीही वस्तू किंवा माणसाबद्दलचा अतिमोह घातक ठरतो. मोहात पडलेला माणूस चुकीचं पाऊल उचलतो. महाभारतातल्या धृतराष्ट्राचंच बघा. त्याला आपल्या मुलांचा आणि त्यातही दुर्योधनाचा मोह होता. या मोहामुळे त्याने कायमच मुलांना पाठीशी घातलं आणि यामुळेच त्यांच्या कुळाचा नाश झाला. म्हणून हे अवगुण दूर सारावे.

## कसं करावं ‘हनुमान चालीसा’चं पठण?





हनुमान ही देवता बलदायी आणि भयनाशक आहे. मारूती स्तोत्र आणि हनुमान चालीस यांच्या नियमित पठणाने अनेक अडचणी आणि दोषांपासून मुक्ती मिळते तसंच हनुमंताची कृपा प्राप्त होते. हनुमान चालीसा पठणाचे काही नियम आहे. या नियमांचं पालन केल्यास भक्तांना अनेक लाभ होतात. हनुमान चालीसाचं पठण कसं आणि कधी करावं, याविषयी...

* रात्रीच्या वेळी हनुमान चालीसा या पोथीचं पठण केल्याने अनेक दोष दूर होतात. साडेसाती मागे लागली असेल तर या उपायामुळे शनीचा नकारात्मक प्रभाव कमी होतो.

* मंगळवार आणि शनिवारी सकाळी हनुमान चालीसाचं पठण करणं लाभदायी मानलं जातं. हनुमान चालीसाच्या पठणाचे अनेक सकारात्मक प्रभाव दिसून येतात. यामुळे आरोग्य सुधारतं तसंच घरात समृद्धी आणि संपन्नता नांदू लागते. अनेक नकारात्मक गोष्टींचा प्रभाव कमी होतो.

* हनुमाान चालीसाचं पठण सकाळी आणि रात्री करावं. रात्रीच्या वेळी आठ वेळा हनुमान चालीसा वाचल्यास साडेसातीचा नकारात्मक प्रभाव कमी होतो.

जाणून घ्या

* हनुमानाची पूजा केल्याने शनीदेव प्रसन्न होतो. हनुमानाच्या भक्तांना शनीच्या कोपाचा त्रास होत नाही, अशीही श्रद्धा आहे. त्यामुळे हनुमानाची आराधना करायला हवी. हनुमानाची आराधना करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे हनुमान चालीसा.


* हनुमान चालीसाच्या पठणाने भक्ताची सगळी पापं दूर होतात. हनुमंताची कृपा होते आणि जीवनात यश मिळतं.

## चीनमधला हिंदू धर्म

चीनमध्ये बौद्ध धर्माचा प्रभाव आहे. या देशातले बहुसंख्य लोक बौद्ध धर्माचे अनुयायी आहेत. पण या देशात हिंदू धर्माच्या खुणाही आढळतात. प्राचीन काळात अनेक देशांमध्ये वैदिक धर्माचं अस्तित्त्व होतं. वैदिक धर्माची व्याप्ती बरीच मोठी होती. चीनमध्येही हिंदू धर्माचं अस्तित्त्व अनेक ठिकाणी आढळतं. या देशातल्या लो यांग जिल्ह्यातल्या सुआन वू प्रांतात एक खांब आहे. या खांबावर संस्कृत भाषेतील मजकूर आढळतो. यावर वरपासून खालपर्यंत संस्कृत भाषेतले श्लोक कोरण्यात आले आहेत. हिंदू धर्मात यमराजाला मृत्यूची देवता मानलं जातं. यम हा मृत्यूलोकाचा राजा मानला जातो. चीनमध्येही अशा देवतेची कल्पना करण्यात आली आहे. यनमो वांग ही चीनमधली मृत्यूची देवता आहे. या देवतेचा यमाशी अगदी जवळचा संबंध आहे.


धर्म देशोदेशीचे

चीनमधल्या शिनमेन क्षेत्रातल्या फुजियान प्रांतात प्राचीन शिव मंदिराचे अवशेष आहेत. इथे आजही पाच फूट उंचीचं शिवलिंग अस्तित्त्वात आहे. शंकराचं मंदिर पूर्णपणे उध्वस्त झालं असलं तरी याच्या अस्तित्त्वाच्याा खुणा ठायीठायी आढळतात तसंच शहरातल्या भिंतींवर वैदिक धर्माशी संबंधित नकाशे आणि चित्रं कोरण्यात आल्याचं दिसून येतं. विशेष म्हणजे विनापत्य चीनी महिला अपत्यप्राप्तीसाठी या मंदिरात शंकराची पूजा करत असत. या मंदिराची निर्मिती तांग साम्राज्य काळात करण्यात आल्याचं बोललं जातं. चीनमधल्या तामिळ समुदायाने तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात मंदिराची डागडुजी केली होती. एकंदरच चीनमध्ये हिंदू मंदिरांच्या अनेक खुणा आढळतात.



## विंड चाईम निवडताना...

अनेक घरांमध्ये विंड चाईम लाव-तात. चीनी वास्तूशास्त्रात विंड चाईमचा वापर सौभाग्यवृद्धीसाठी केला जातो. विंड चाईममुळे हवेतल्या सकारात्मक लहरी घरात प्रवाही राहतात आणि घरातली संपन्नता टिकून राहते, असं मानलं जातं. विंड चाईमचे अनेक लाभ आहेत. अर्थात हे लाभ मिळवण्यासाठी त्याची निवड योग्य पद्धतीने करायला हवी. विंड चाईमची निवड कशी करायची, याविषयी...



* विंड चाईममुळे विशिष्ट प्रकारचा ध्वनी निर्माण होतो. या ध्वनीमुळे हवेतली ची ऊर्जा प्रभावित होते. ही ऊर्जा घरात सकारात्मक तरंग निर्माण करते. त्यामुळे विंड चाईमचा ध्वनी मधूर असला पाहिजे. हा ध्वनी घरातल्या प्रत्येक सदस्याला आवडायला हवा.

* धातूच्या विंड चाईम्स विकत घ्या. लाकूड किंवा प्लास्टिकच्या चाईम्सच्या तुलनेत धातूच्या चाईम्सचा आवाज अधिक तीव्र स्वरूपाचा असतो. यामुळे वातावरणातली ची ऊर्जा जलद गतीने सक्रिय होते.



* विशिष्ट प्रकारच्या अडचणी आणि समस्यांचं निवारण करण्यासाठी लाकूड किंवा मातीच्या चाईम्सचा वापरल्या जातात. पण मातीच्या चाईम्सची जास्त काळजी घ्यावी लागते. मातीची चाईम तुटल्यास अडचणींमध्ये वाढ होण्याची शक्यता असते.

* विंड चाईम्स लावताना दिशेकडे विशेष लक्ष द्यायला हवं. पूर्व आणि दक्षिण दिशा अधिक लाभदायी मानल्या जातात. पूर्वेकडे लाकडाच्या चाईम्स लावल्यास समृद्धी नांदू लागते.

* विंड चाईमचा आकार ठरवताना जागेचा विचार व्हायला हवा. मोठ्या जागेत मोठ्या आकाराचं विंड चाईम असावं. छोट्या विंड चाईममुळे मोठ्या जागेतला प्रभाव कमी होऊ शकतो.

वास्तूभक्ती

* गृहसजावटीसाठी विंड चाईमचा वापर करायचा असेल तर हवेशीर कोपऱ्याची किंवा दाराची निवड करा.

* घरात शांतता हवी असेल तर उत्तर, पश्चिम किंवा उत्तर-पश्चिम दिशेला धातूचं विंड चाईम लावा.

* सहा दांड्या असणारं विंड चाईम हॉलच्या उत्तर-पश्चिम कोपऱ्यात लावा. यामुळे सौभाग्यवृद्धी होते.

## जबलपूरचे शादीवाले हनुमानजी

हनुमानाला ब्रह्मचारी मानलं जातं. पण मध्य प्रदेशातल्या जबलपूरजवळच्या मंदिरातला हनुमान लग्नाचा आशीर्वाद देतो. लग्न व्हावं यासाठी या मंदिरात विवाहोत्सुक तरूण-तरूणींची गर्दी असल्याचं पहायला मिळतं. जबलपूरपासून २० किलोमीटर अंतरावर आगासौद नावाचं गाव आहे. या गावात हनुमानाचं मंदिर वसलंय. सिद्ध हनुमान मंदिर या नावाने ते ओळखलं जातं. या हनुमानाला शादीवाले हनुमानजी असंही म्हटलं जातं. इथे येणाऱ्या लग्नाळू तरूणांच्या जोड्या जमतात अशी भाविकांची श्रद्धा आहे. मंगळवार, गुरूवार आणि शनिवारी भाविकांची मोठी गर्दी असते.



या हनुमानाकडे साकडं घातल्यानंतर तीन महिन्यांत विवाहोत्सुक तरूणांचा विवाह ठरतो, असं म्हणतात. सुखी वैवाहिक जीवनासाठी सिद्ध हनुमानाचे आशीर्वाद घेतले जातात. या हनुमानाला गुलाबाचं फूल अर्पण केलं तर नवस पूर्ण व्हायला फार वेळ लागत नाही, अशीही श्रद्धा आहे. गुलाबासोबत पिवळ्या कपड्यात बांधलेला नारळ हनुमानाला अर्पण करावा लागतो. त्यानंतर तीनदा मंदिरात यावं लागतं. यानंतर तीन महिन्यांच्या आता भक्ताचं लग्न ठरतं. लग्न ठरण्यासाठी इथे गुरूवारी यावं लागतं. पिवळ्या कपड्यातला नारळ, गुलाबाचं फूल आणि सुपारी अर्पण करताना कुलदेवतेचं स्मरण करावं लागतं. त्यानंतर हा सिद्ध मारूती तुमच्या मनोकामना पूर्ण करतो. या मारूतीला शादीवाले हनुमानजी हे नाव का पडलं, याबाबतचं गुपित आता उघड झालं असेल.

तीर्थक्षेत्र